## ‘शिंदे गट निवडणुकांच्या मैदानात उतरतोय जोरात!’

**मुंबई :** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुकांसाठी शिवसेना (शिंदे गट) आता सज्ज होत आहे. पक्षप्रमुख आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्वतः पुढाकार घेत आपल्या आमदारांना राजकीय बळ देण्यासाठी व्यापक नियोजनाला सुरुवात केली आहे. याअंतर्गत शिंदे गटाने आपल्या मंत्र्यांवर निवडणुकीसाठी विभागनिहाय जबाबदाऱ्या सोपवल्या असून, विविध मतदारसंघांतील प्रलंबित कामांबाबत आढावा बैठका घेतल्या जात आहेत.

**निवडणूकपूर्व नियोजनाचा फॉर्म्युला सक्रिय**

नांदेड, पुणे, अंधेरी (पूर्व) या मतदारसंघांतील पेंडिंग विकासकामांसंदर्भात अलीकडेच महत्वाच्या आढावा बैठकांचे आयोजन करण्यात आले.या बैठकीत स्थानिक पातळीवरील रस्ते, पाणीपुरवठा, गटारी, आरोग्य व शिक्षण क्षेत्रातील प्रलंबित प्रकल्पांबाबत चर्चा झाली. यामागचा उद्देश स्पष्ट आहे . विकासकामांची गती वाढवून मतदारांमध्ये विश्वास निर्माण करणे.

**शिंदे गटाच्या मंत्र्यांना निवडणुकीची फील्ड कमांड**

एकनाथ शिंदे यांनी आपल्या गटातील प्रत्येक मंत्र्याला विशिष्ट जिल्ह्यांची जबाबदारी सोपवली आहे, जिथे ते निवडणुकीसंदर्भात संघटनात्मक बांधणी, प्रचार आणि स्थानिक कामांच्या गतीवर लक्ष ठेवणार आहेत. हे पाऊल म्हणजे निवडणुकीपूर्वीचा एक स्पष्ट संदेश आहे. ‘शिंदे गट निवडणुकांसाठी मैदानात उतरतोय पूर्ण ताकदीने!

## मुंबई हायकोर्टाने प्रकाश आंबेडकरांची याचिका फेटाळली

**मुंबई :** वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत मतदानाची वेळ संपल्यावर ७६ लाख लोकांनी मतदान केल्याचा आरोप करत याबाबत मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. ही याचिका उच्च न्यायालयाने फेटाळून लावली आहे. मुंबईचे रहिवासी असलेले याचिकाकर्ते चेतन चंद्रकांत अहिरे यांनी दाखल केलेल्या रिट याचिकेवर विचार करण्यास न्यायमूर्ती जी.एस. कुलकर्णी आणि न्यायमूर्ती आरिफ डॉक्टर यांच्या खंडपीठाने नकार दिला. खंडपीठाने म्हटले आहे की याचिकेने न्यायालयाचा वेळ वाया घालवला, परंतु शुल्क आकारले नाही. न्यायालयाने म्हटले, वरील तथ्यांच्या प्रकाशात, आम्हाला शंका नाही की ही याचिका फेटाळली पाहिजे. त्यानुसार ती फेटाळली जात आहे. याचिकेवर सुनावणी करण्यात या न्यायालयाचा एक संपूर्ण दिवस वाया गेला. असे असले तरी आम्ही कुठलेही शुल्क लावणार नाहीत, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

विधानसभा निवडणुकीच्या मतदान प्रक्रियेत घोळ झाल्याने राज्यातील सर्व २८८ विधानसभा मतदारसंघांमधील जाहीर झालेले निकाल रद्द करावेत अशी मागणी याचिकाकर्त्याने न्यायालयात केली. अहिरे यांनी दाखल केलेल्या याचिकेत सायंकाळी ६ वाजताच्या अधिकृत मतदान वेळेनंतर जास्तीचे मतदान झाल्याचे अधोरेखित करण्यात आले होते, विशेषतः अंतिम मुदतीनंतर ७५ लाखांहून अधिक मते नोंदविण्यात आली, असा दावा करण्यात आला होता. याव्यतिरिक्त, त्यांनी ९० हून अधिक मतदारसंघांमध्ये मतदान झालेल्या आणि मोजलेल्या मतांमधील तफावतीकडे लक्ष वेधले.

## हिंदीच काय पहिलीपासून इंग्रजीही नको तारा भवाळकर यांची कणखर भूमिका



**मुंबई :** हिंदीच काय पहिलापासून इंग्रजीही नको. विद्यार्थ्यांना चौथीपर्यंत फक्त मातृभाषेतच शिक्षण द्या. जगाच्या पाठीवर कुठेही इतक्या भाषा इतक्या लहान वयात शिकवल्या जात नाहीत. मुलांना पाचवीपासून दुसरी भाषा आणि आठवीपासून तिसरी भाषा शिकवा. हे संपूर्ण शिक्षण क्षेत्राच्या आणि विद्यार्थ्यांच्या हिताचे आहे, अशी कणखर भूमिका साहित्य संमेलनाध्यक्ष आणि लोकसाहित्याच्या अभ्यासक डॉ. तारा भवाळकर यांनी माध्यमांशी बोलताना मांडली. सुप्रसिद्ध लेखक अरविंद जगताप यांनीही हिंदी सक्तीला विरोध केला. ’सक्तीची भक्ती काही कामाची नसते. त्याने उलट देवाचे बदनामी होते. आपण कितीतरी हिंदी लेखकांचे फॅन आहोत. पण ते आपलं प्रेम आहे. ती सक्ती नाही,’ अशा शब्दांत त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

## दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी ‘डबल चान्स’! वर्षातून दोनदा बोर्ड परीक्षा, सर्वोत्तम निकाल ग्राह्य

**मुंबई :** दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी एक मोठी आणि महत्त्वाची बातमी! केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ (उइडए) ने शिक्षण क्षेत्रात ऐतिहासिक पाऊल टाकत इयत्ता १० वीची बोर्ड परीक्षा आता वर्षातून दोनदा घेण्याचा निर्णय घेतला आहे. हा निर्णय २०२६ पासून लागू होणार असून, विद्यार्थ्यांना त्यांच्या गुणवत्तेचे सर्वोत्तम दर्शन घडवण्याची संधी यातून मिळणार आहे.

**फेब्रुवारी आणि मे दोन परीक्षांची संधी, एकच उत्तम निकाल**

CBSE च्या नव्या धोरणानुसार, इयत्ता १० वीच्या परीक्षा फेब्रुवारी आणि मे महिन्यांमध्ये घेतल्या जातील. विद्यार्थ्यांना दोन्ही वेळा परीक्षेला बसण्याची संधी असेल आणि या दोन परीक्षांपैकी ज्या वेळेस उत्तम गुण मिळतील, तोच निकाल अंतिम मानला जाईल. या निर्णयामुळे विद्यार्थ्यांना एकाच वेळच्या परीक्षेचे दडपण जाणवणार नाही आणि चुकून काही कमी गुण मिळाल्यास ती भरपाई दुसऱ्या परीक्षेत करता येणार आहे.

**तणावमुक्त शिक्षण आणि सतत मूल्यांकन**

CBSE ने यामागचा हेतू स्पष्ट करताना म्हटलं आहे की, विद्यार्थ्यांवरील परीक्षेचा ताण कमी करणे, चुकांमधून शिकण्याची संधी देणे आणि शिक्षण अधिक लवचिक बनवणे हे आमचे मुख्य उद्दिष्ट आहे.या धोरणामुळे विद्यार्थ्यांची मानसिकता बदलणार असून शिक्षण ही केवळ एक परीक्षा नसून, एक विकासाची प्रक्रिया आहे, हा दृष्टिकोन रुजवण्याचा प्रयत्न आहे.

## शक्तिपीठ महामार्गावर मंत्रिमंडळ बैठकीत दोन्ही बाजूंचे मुद्दे मांडले

■ **महासागर प्रतिनिधी,**
**मुंबई, दि. २५ :**

राज्यातील महत्त्वाकांक्षी ‘शक्तिपीठ महामार्ग’ योजनेवर आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत या महामार्गाशी संबंधित दोन्ही पक्षांची मते सविस्तरपणे मांडण्यात आली. राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी याबाबत माहिती देताना स्पष्ट केलं की, गृहनिर्माण मंत्री प्रकाश आबिटकर आणि सहकारमंत्री हसन मुश्रीफ यांना मंत्रिमंडळ बैठकीत स्वतंत्रपणे आपली बाजू मांडण्यासाठी वेळ देण्यात आला होता.

शक्तिपीठ महामार्गाच्या नियोजन, मार्गक्रमण आणि भूसंपादनाच्या मुद्द्यांवर काही मतभेद असून, यासंदर्भात जनतेच्या भावना आणि स्थानिक परिस्थिती लक्षात घेऊन दोन्ही मंत्र्यांनी आपली मते मांडली. उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले, ङ्कसरकार कोणत्याही प्रकल्पात लोकशाही मूल्यांचा विचार करते. त्यामुळे मंत्रिमंडळात प्रकाश आबिटकर आणि हसन मुश्रीफ यांना समान वेळ देऊन त्यांची बाजू ऐकून घेतली. पवनार (जि. वर्धा) ते पत्रादेवी (जि. सिंधुदुर्ग) असा प्रस्तावित शक्तिपीठ महामार्ग सुमारे १८ तीर्थक्षेत्रांना जोडणारा द्रुतगती मार्ग आहे. या महामार्गामुळे साडेतीन शक्तिपीठे, दोन ज्योतिर्लिंग आणि पंढरपूर-अंबेजोगाई यासारख्या प्रमुख तीर्थक्षेत्रांना जोडणं शक्य होणार आहे. महामार्गाच्या भूसंपादन व अंमलबजावणीसाठी २० हजार कोटींच्या निधीला मंत्रिमंडळानं मान्यता दिली आहे.

हा प्रकल्प महामंडळामार्फत राबवला जाणार असून, स्थानिक प्रश्न आणि अडचणी लक्षात घेत सर्व संबंधित मंत्र्यांचा सहभाग, त्यांची मते आणि सूचना यांना गांभीर्याने विचारात घेतले जातील, असं अजित पवार यांनी स्पष्ट केलं. या महामार्गामुळे पर्यटन, रोजगार, आध्यात्मिक आणि स्थानिक विकासाला चालना मिळणार असल्याचंही मंत्रिमंडळात अधोरेखित करण्यात आलं.

# नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा

### प्रमुख धरणातून विसर्ग सुरू: विदर्भात जोरदार सरी कोसळण्याचा अंदाज



मुंबई महानगर आणि परिसर

■ **महासागर प्रतिनिधी,**
**मुंबई, दि. २५ :** मान्सूनने संपूर्ण राज्य व्यापले असून आज राज्यातील विविध भागात पावसाने जोरदार हजेरी लावली आहे. भारतीय हवामान विभागाच्या अंदाजानुसार, मान्सून २०२५ मध्ये महाराष्ट्रात सरासरीपेक्षा जास्त पाऊस पडण्याची शक्यता आहे. जून महिन्यात अवकाळी नंतर हा मान्सून सक्रीय आणि गतिमान राहिला आहे. गत वर्षीपेक्षा २६% जास्त पाऊस आतापर्यंत पडलेला आहे. आज आणि उद्या महाराष्ट्रात ढगाळ वातावरणासह अनेक भागांत मध्यम ते जोरदार पावसाचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. कोकण, मुंबई, पुणे, नाशिक, घाटमाथा, मराठवाडा आणि विदर्भातील काही भागांत विजांसह जोरदार सरी कोसळण्याची शक्यता आहे. समुद्रकिनारी उंच लाटा आदळण्याचा इशारा देण्यात आला आहे, त्यामुळे मच्छीमारांना सतर्कतेचा सल्ला देण्यात आला आहे. कोल्हापूर, सातारा, अमरावती आणि नागपूर परिसरातही काही ठिकाणी वादळी वाऱ्यासह पाऊस पडण्याची शक्यता आहे.

मुंबईसह ठाणे, पालघरमध्ये ङ्कयलो अलर्टङ्क जाहीर करण्यात आला असून, निचऱ्याच्या भागात पाणी साचण्याची शक्यता लक्षात घेता स्थानिक प्रशासन सज्ज आहे. नागरिकांनी अनावश्यक प्रवास टाळावा, घराबाहेर पडताना छत्रीचा वापर करावा आणि हवामान विभागाच्या सूचनांचे पालन करावे, असा सल्ला देखील प्रशासनाच्या वतीने ? देण्यात आला आहे.

**कोकणासाठी ऑरेंज अलर्ट जारी**

कोकणात मुसळधार पाऊस सुरू आहे. रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्गमध्ये सरासरीपेक्षा ३०-४०% अधिक पाऊस पडला आहे. तसेच या भागासाठी हवामान विभागाने आधीच ऑरेंज अलर्ट जारी केलेला आहे.

तसेच या भागात दरड कोसळण्याचा धोका देखील वाढला आहे. विभागातील नदी-नाल्यांच्या पाणी पातळीत वाढ झाली आहे. या सर्व पार्श्वभूमीवर प्रशासनाला सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

सांताक्रुझ वर ४२५.२मिमी, कुलाबा ४७७.८मिमी पावसाची नोंद झाली आहे. जून महिन्यात सरासरीच्या ८०% पाऊस झाला आहे. तसेच मुंबई आणि परिसरात आज देखील ढगाळ वातावरण असून थोडा पाऊस पडण्याची शक्यता आहे. पुढील चार दिवस हलका ते मध्यम पाऊस सुरू राहणार असल्याचा अंदाज हवामान विभागाच्या वतीने वर्तवण्यात आला आहे. तसेच समुद्रातील ४.५-४.८मीटर दरम्यान लाटा निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे समुद्रकिनारी चिंताजनक स्थिती निर्माण होऊ शकते.

**पुणे व कोकण घाट**-ताम्हिनी घाटात ३७० मिमी, लोणावळ्यात २०५ मिमी, इतर भागात ८०-१५०मिमी पावसाची नोंद करण्यात आली आहे. पुण्याजवळील खडकवासला धरणात ७०% पाणीसाठा आहे. पुण्यात हलका ते मध्यम पाऊस पडण्याचा अंदाज आहे. तर कोकण घाटात जोरदार भरण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. हवामान विभागने यलो अलर्ट जारी केल आहे.

राज्यातील प्रमुख उजनी, खडकवासला, गंगापूर, दारणा, नांदूर-मध्यमेश्वर आणि इतर मध्य-महाराष्ट्रातील धरणांमधून नियंत्रित पाणी विसर्ग सुरू आहे. यामुळे पुणे-मुठा नदी परिसर, नाशिकमधील नदीकाठ व ग्रामीण भाग, तसेच सोलापूर-पंढरपूमार्ग, या क्षेत्रांत सतर्कता आवश्यक आहे. स्थानिक प्रशासनाने बचाव तथा आपत्ती व्यवस्थापनासाठी सज्जता ठेवली आहे. नागरिकांनी प्रशासनिक सूचना पाळून सतर्क राहावे, असे आवाहन देखील करण्यात आले आहे.

# चौथ्या महिला धोरण २०२४च्या माध्यमातून महिला व मुलींसाठी सक्षम वातावरण तयार करणार!

### उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री एकनाथ शिंदे यांची ग्वाही

■ **महासागर प्रतिनिधी,**
**मुंबई, दि. २५ :**

चौथे महिला धोरण २०२४ जाहीर झाले असून या धोरणाच्या अंमलबजावणीसाठी विविध विभागांनी प्रभावीपणे काम करावे.या धोरणाच्या माध्यमातून राज्य शासन महिला व मुलींसाठी सक्षम वातावरण तयार करत आहे. त्यामुळे मुंबई शहरातील महिलांसाठी असलेल्या योजनांबाबत एकाच ठिकाणी माहिती मिळण्यासाठी एक नवीन ॲप तयार करण्याचे स्पष्ट निर्देश उपमुख्यमंत्री व मुंबई शहर पालकमंत्री एकनाथ शिंदे यांनी मंगळवारी येथे दिले. चौथे महिला धोरण २०२४ जिल्हास्तरीय अंमलबजावणी सुकाणु समितीची बैठक आज उपमुख्यमंत्री व मुंबई शहरचे पालकमंत्री शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत मुंबई जिल्हाधिकारी कार्यालयात पार पडली.यावेळी उपमुख्यमंत्री कार्यालयाचे प्रधानसचिव नविन सोना,जिल्हाधिकारी आंचल गोयल,अपर जिल्हाधिकारी रवि रतन कटकधोंड,निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.शिवनंदा लंगडापुरे, उपजिल्हाधिकारी महादेव किरवले, समाजकल्याण अधिकारी रविकिरण पाटील, सहायक आयुक्त, कौशल्य विकास, मुंबई शहर शैलेश भगत, मुंबई शहरच्या महिला व बालविकास अधिकारी शोभा शेलार यासह विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते. उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले, मुंबई शहरातील लोकसंख्या लक्षात घेवून येथील नोकरदार महिलांसाठी हॉस्टेल, लहान मुलांसाठी पाळणाघर, झोपडपट्टी भागात तसेच इतर गरजू महिला असतील त्या ठिकाणी महिला बचत गट स्थापन करणे, बचतगटांना रोटेशन पध्दतीने स्टॉल उपलब्ध करून देणे, महिलांचा पर्यटन क्षेत्रात सहभाग वाढावा यासाठी पर्यटनाचे प्रकल्प विकसित करणे, महिला मच्छिमारांसाठी शासकीय योजना राबविणे यावर भर देण्यात यावा. आदिवासी महिलांसाठी असलेल्या विविध योजना प्रभावीपणे राबवाव्यात. घरांचा प्रश्न सोडवण्यासाठी नियोजित प्रकल्प वेळेत पूर्ण करणे, महिलांना आरोग्य सुविधा तत्काळ देणे तसेच काळानुरूप आरोग्य सुविधा वाढविणे याबाबत काम करावे. राज्य सरकार कडून सरकार आपल्या दारी, मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना, लखपती दीदी योजना, मुलींना मोफत उच्च शिक्षण देणे यासारख्या योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी केली जात असल्याचेही त्यांनी यावेळी नंतर पत्रकारांशी बोलताना सांगितले. राज्यातील महिला हिंसाचाराला आळा घालण्यासाठी कठोर उपाययोजना केल्या जात असून शासनाकडून राबविण्यात येणा-या सुरक्षा तसेच इतर महत्वपूर्ण योजना एकाच ॲपवर उपलब्ध होतील यासाठी मुंबई शहरसाठी ॲप विकसित करून ते ॲप सर्व महिलापर्यंत पोहोचवा. महिलांच्या मदतीसाठी राबवल्या जाणाऱ्या विविध योजना तत्काळ पोहोचवाव्यात. हेल्प डेस्कची व्याप्ती वाढवा,हिरकणी कक्ष नियमित सुरू ठेवा, महिला समुपदेशन केंद्रात तत्काळ समुपदेशन केले जावे, वन स्टॉप सेंटरमध्ये महिलांना सुविधा द्याव्यात.पोलीस स्टेशनमध्ये आल्यानंतर तक्रार देताना महिलांना आधार वाटला पाहिजे. त्यांनी कोणत्याही दबावाला बळी न पडता तक्रार दाखल करावी अशा प्रकारचे वातावरण पोलीस स्टेशनमध्ये असावे. शासन महिलांच्या बाबतीत आलेल्या तक्रारी फास्ट ट्रॅकवर घेत आहे.कारण राज्याला एक ट्रिलीयन अर्थव्यवस्थेकडे नेण्यासाठी महिलांचाही मोठा वाटा असणे गरजेचे असल्याने प्रशासनानेही त्या दृष्टीने काम करावे असेही निर्देश दिल्याची माहितीही उपमुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी दिली.यावेळी जिल्हाधिकारी आंचल गोयल यांनी जिल्ह्यात चौथे महिला धोरण २०२४ च्या अनुषंगाने सुरू असलेल्या विविध योजनांची माहिती दिली.तर जिल्हा महिला व बालविकास अधिकारी शोभा शेलार यांनी चौथे महिला धोरण-२०२४ संदर्भात जिल्हास्तरीय सुकाणू समिती करत असलेल्या कामाचे सादरीकरण केले.

## राज्य उत्पादन शुल्क विभागाची जाहिरात नियमबाह्य

### एमपीएससीवर कोणाचा दबाव? जितेंद्र आव्हाड यांचा आरोप

■ **महासागर प्रतिनिधी,**
**मुंबई, दि. २५ :** राज्य उत्पादन शुल्क विभागाने काढलेल्या जाहिरातीवर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी आक्षेप घेतला आहे. राज्य उत्पादन शुल्क विभागाने खात्यांतर्गत दुय्यम निरीक्षकपदासाठी जाहिरात काढली आहे. परंतु, ही जाहिरात नियमबाह्य असल्याचा आरोप जितेंद्र आव्हाड यांनी केला आहे. तसेच जाहिरातीमध्ये दुय्यम निरीक्षक पदासाठी लिपिक असलेल्या कर्मचाऱ्यांनाही प्रवेश देण्याचा निर्णय एमपीएससीने कोणाच्या दबावाखाली घेतला, असा सवालही त्यांनी उपस्थित केला आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने राज्य उत्पादन शुल्क विभागातील दुय्यम निरीक्षक पदाच्या १३७ जागांसाठी जाहिरात प्रसिद्ध केली आहे. राज्य उत्पादन शुल्क विभागात काम करणाऱ्या



कर्मचाऱ्यांसाठी ही पदभरती असून ११५ पदे जवान संवर्गासाठी तर २२ पदे ही लिपिक संवर्गासाठी आहेत. परंतु, ही जाहिरात नियमबाह्य असल्याचे जितेंद्र आव्हाड यांनी म्हटले आहे. जितेंद्र आव्हाड यांनी एक्सवर ट्विट करत जाहिरातीचे फोटो शेअर केले आहेत. या जाहिरातीवर आक्षेप घेत ते म्हणाले, राज्य उत्पादन शुल्क विभागाचा अजब कारभार! राज्य उत्पादन शुल्क विभागामध्ये दुय्यम निरीक्षक म्हणजेच सब इन्स्पेक्टर या पदांसाठी विभागीय भरतीची जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली आहे.

## इराण-इस्रायलयुद्धात भारताच्या भूमिकेवर शरद पवार नाराज



**मुंबई :** एकीकडे इराण जुना मित्र. त्याच्याकडून मोठ्या प्रमाणात तेल खरेदी. दुसरीकडे इस्रायलकडून कायम भारताला खंबीर पाठिंबा, तांत्रिक साहाय्य. यामुळे भारताने इराण-इस्रायलयुद्धात कोणतीही भूमिका घेतली नाही, असे म्हटले जाते. मात्र, यामुळे शरद पवार प्रचंड नाराज झाले आहेत. बघ्याची भूमिका घेतल्याने भारताला आता दूरगामी परिणाम भोगावे लागणार, असा अतिशय गंभीर इशारा त्यांनी दिला आहे. मुंबई येथे काही पत्रकारांना अनौपचारिक चर्चेसाठी बोलावून त्यांनी मनातल्या गोष्टी औपचारिकपणे व्यक्त केल्या. ते म्हणाले की, इराण-इस्रायल युद्धात भारताने बघ्याची भूमिका घेणे अचंबित करणारे आहे. अरब देशात मोठ्या प्रमाणावर भारतीय काम करतात. शिवाय तेलाचाही संबंध आहे. त्यामुळे या दोन देशांच्या युद्धामध्ये भूमिका न घेणे योग्य नाही, माळेगाव साखर कारखाना निवडणुकीत अजित पवारांचे पॅनल आघाडीवर असल्याचे स्पष्ट संकेत मिळू लागल्याने ते म्हणाले की, सरकारमध्ये मोठ्या पदावरील व्यक्तींनी सहकारी संस्थांच्या निवडणुक लढवू नये. मी माझ्या ४० वर्षांच्या कारकिर्दीत सरकारी पदावर असताना कधीही सहकारी संस्थांची निवडणूक लढलो नाही.

**तिसऱ्या भाषेचे ओझे नको, पण हिंदी शिकली पाहिजे**

सध्या पाचवीपासून मुले हिंदी शिकतात. त्यामुळे इयत्ता पहिली ते चौथीपर्यंत हिंदी भाषेची सक्ती योग्य नाही. मात्र हिंदी भाषा शिकणेही तितकेच महत्वाचे आहे. देशातील सुमारे ५५ टक्के नागरिक हिंदी भाषा बोलतात, त्यामुळे हिंदीचा विरोध करण्याची गरजही नाही, असे दोन्ही बाजूंची सारवासारव करणारे वक्तव्य शरद पवारांनी केले.

# नाशिकमध्ये जून महिन्यात विक्रमी पाऊस

### गोदावरीला आठवडाभरात दुसऱ्यांदा पूर, शहरातील ऐतिहासिक मंदिरे आणि घाट पाण्याखाली

■ **महासागर प्रतिनिधी,**
**नाशिक , दि. २५ :** यंदाच्या जून महिन्यात नाशिक शहर आणि जिल्ह्यात झालेल्या जोरदार पावसाने गेल्या दहा वर्षांतील सर्व विक्रम मोडीत काढले असून, अवघ्या महिनाभरात तब्बल ४३९ मिमी पावसाची नोंद झाली आहे. सलग कोसळणाऱ्या पावसामुळे जिल्ह्यातील धरणांमध्ये जलसाठा झपाट्याने वाढला असून, गंगापूरसह अनेक धरणांतून पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला आहे. त्यामुळे गोदावरीला आठवडाभरात दुसऱ्यांदा पूर परिस्थिती निर्माण झाल्याचे पाहायला मिळाले. नाशिक शहरातील अनेक ऐतिहासिक मंदिरे आणि घाट पाण्याखाली गेली आहेत. सध्या नाशिक व त्र्यंबकेश्वर परिसरात पावसाची संततधार सुरू असून, हवामान खात्याने पुढील काही दिवस पावसाचा जोर कायम राहील असा अंदाज वर्तवला आहे. परिणामी, धरणसाठ्यात



आणखी वाढ होण्याची शक्यता आहे.

नाशिकमध्ये गोदावरी नदीची पूरस्थिती सलग सहाव्या दिवशीही कायम आहे. दुतोंड्या मारुतीच्या कमरेपर्यंत पुराचे पाणी पोहोचले असून, रामकुंड आणि गोदा घाटाचा परिसर पूर्णपणे पाण्याखाली गेला आहे. गोदा घाटावरील अनेक मंदिरांना पुराच्या पाण्याने वेढा दिला आहे, तर अनेक लहान मंदिरे पूर्णपणे पाण्याखाली बुडाली आहेत. यामुळे जनजीवन विस्कळीत झाले असून, प्रशासनाकडून परिस्थितीवर लक्ष ठेवले जात आहे.

**आठ दिवसांत धरणसाठ्यात १३ टक्के वाढ**

जिल्ह्यात सुरू असलेल्या संततधारेमुळे अवघ्या आठ दिवसांत धरणसाठ्यात तब्बल १३ टक्के वाढ झाली आहे. धरणांची सरासरी भरवण आता २५% वरून ३८% पर्यंत पोहोचली आहे. गंगापूर धरण ६५% क्षमतेने भरले असून, यामधून जवळपास ६ हजार क्यूसेकने पाणी गोदावरी नदीत सोडण्यात येत आहे. गंगापूरसह दारणा, कडवा आणि नांदूरमध्यमेश्वर या धरणांतूनही मोठ्या प्रमाणात विसर्ग सुरू आहे. विशेषतः नांदूरमध्यमेश्वर बंधाऱ्यातून १५ हजार क्यूसेस वेगाने पाणी सोडले जात असून, गोदावरीच्या पाणी पातळीत झपाट्याने वाढ होत आहे. यामुळे नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

# पुणे मेट्रोच्या विस्ताराला मंजुरी

### वनाज-चांदणीचौक आणि रामवाडी-वाघोलीमार्गासाठी ३,६२६ कोटी मंजूर

**पुणे , दि. २५ :** पुणे शहराच्या मेट्रो विस्तारीकरणासाठी सुरू असलेल्या पाठपुराव्याला यश आले असून, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखालील केंद्रीय मंत्रिमंडळाने पुणे मेट्रो प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्याला मंजुरी दिली आहे. त्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे पुणेकरांच्या वतीने केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी आभार मानले आहे. ?३,६२६.२४ कोटींचा हा प्रकल्प महा-मेट्रोमार्फतपुढील ४ वर्षांत पूर्ण करण्यात येणार आहे. मंजूर झालेल्या मेट्रो मार्ग मध्ये वनाज-चांदणीचौक (कॉरिडॉर २ए) आणि रामवाडी-वाघोली/विठ्ठलवाडी (कॉरिडॉर २बी) हे दोन उन्नत मार्ग समाविष्ट आहेत. या नवीन मेट्रो मार्गांच्या माध्यमातून वनाज-रामवाडीमार्गाचे विस्तारीकरण केले जाणार असून, पुणे शहराच्या पूर्व आणि पश्चिम भागाला गतिमान करण्यासाठी हे निर्णायक पाऊल ठरणार आहे. या मंजुरीसाठी नुकतीच केंद्रीय नगरविकास मंत्री मनोहरलाल खट्टर यांची भेट मुरलीधर मोहोळ यांनी घेतली होती. मंजुरी मिळालेल्या या १२.७५ किमी लांबीच्या मेट्रो मार्गावर १३ स्थानकं असतील, जी बावधन, कोथरूड, खराडी, वाघोलीसारख्या महत्त्वाच्या भागांना मेट्रोशी जोडतील. हा प्रकल्प आय टी हब्स, शैक्षणिक संस्था, निवासी व व्यावसायिक क्षेत्रांतील दैनंदिन प्रवासाला सुरक्षित, जलद आणि पर्यावरणपूरक पर्याय देईल. पुण्याची वाहतूक व्यवस्था सशक्त करणारा हा ऐतिहासिक निर्णय आहे.हे नवीन मार्ग जिल्हा न्यायालय इंटरचेंज स्थानकावरून लाईन-१(निगडी-कात्रज)आणि लाईन-३ (हिंजवडी-जिल्हान्यायालय) यांच्याशी जोडले जाणार आहे.चांदणी चौक व वाघोली येथे आंतर शहर बससेवा मेट्रोशी जोडली जाणार आहे.



## २६ जून आंतरराष्ट्रीय नशा निषेध दिवस

दरवर्षी २६ जूनला जगभर आंतरराष्ट्रीय नशा निरोधक दिवस साजरा केल्या जातो.नशेली वस्तुंचे निवारण व्हावे या उद्देशाने संयुक्त राष्ट्र महासभेने ७ डिसेंबर १९८७ला एक प्रस्ताव पारित केला व त्या अनुषंगाने युनोने १९८८ पासून दरवर्षी नशेली पदार्थांच्या सेवनाने होणाऱ्या दुष्परिणामाच्या प्रती समाजात जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने दरवर्षी २६ जूनला आंतरराष्ट्रीय अंमली पदार्थ विरोधी दिवस म्हणून साजरा केल्या जातो.सध्याच्या आधुनिक युगात नशेच्या सेवनाचे प्रमाण वाढल्याने नशेली पदार्थांचा वाममार्गाने मोठा व्यापार आपल्याला दिसुन येतो. कोणतीही नशा असो शरिराला व आयुष्याला घातकच आहे.कारण नशा हा शब्दच असा आहे की प्रत्येकांचे आयुष्य उद्ध्वस्त करतो मग ती कोणतीही नशा असो.त्यामुळे आजच्या युवा पिढीने नशेली पदार्थांपासून सावधान रहाणे अत्यंत गरजेचे आहे.कारण नशेली वस्तू युवावर्गापर्यत पोहोचविण्याचे काम तस्करीच्या माध्यमातून केले जाते.भारतात बांगलादेश, पाकिस्तान, नेपाळ, ईरान, अफगाणिस्तान मार्गे विदेशी तस्कर नशेली पदार्थ पुरविण्याचे काम करीत असतात.ड्रग्स पुरवठ्याचे जाळे तस्करीच्या माध्यमातून संपूर्ण जगभर विनल्या गेले आहे.भारतार दर महिन्याला अवैधरित्या आलेली करोडो रुपयांची ड्रग्स,एमडी पकडली जाते.तरीही युवावर्गामध्ये नशेचे प्रमाण अजूनही कमी झालेले नाही ही अत्यंत गंभीर व चिंताजनक बाब आहे.मागीलवर्षी २२ जून २०२४ ला गुजरातच्या समुद्र किनाऱ्यावर बीएसएफ जवानांनी १५० करोड रुपयांची ड्रग्स पकडली ही ड्रग्स कच्छच्या क्रिक भागात लावारिस पडलेली सापडली. सरकारी माहितीनुसार या ड्रग्सचे तार ईरान व अफगाणिस्तानशी असल्याचे सांगण्यात आले होते.यावरून स्पष्ट होते की काही विदेशी असामाजिक तत्व भारतीय युवा पिढीला नेशेच्या खाईत लोटण्याचे काम करीत आहे.त्यामुळे आजच्या तरुण पिढीने व युवा वर्गाने नशेली पदार्थांपासून सावध रहाने अत्यंत गरजेचे आहे.कारण कोणतीही नशा ही महाघातक असते. कोणत्याही नशेपासुन शरिराला यत्किंचितही लाभ होत नाही ;उलट त्याचे शरिरावर व परिवारावर मोठ्या प्रमाणात दुष्परिणाम होतांना दिसतात. सध्याच्या परिस्थितीत हॉटेल किंवा हुक्का पार्लर मधुन ड्रग्सचा पुरवठा होतो हेही लक्षात आले आहे. त्यामुळे अशा हॉटेलवर प्रशासनाकडुन कठोर कारवाई व्हायला हवी.अशाच पध्दतीने पबमध्ये सुद्धा ड्रग्सचा गोरखधंदा चालत असावा याला सुध्दा नाकारता येत नाही.यावर प्रशासनाने लक्ष केंद्रित केले पाहिजेत.देशात नशेली पदार्थांवर प्रतीबंध आहे. परंतु तस्करीच्या माध्यमातून अफीम, गांजा, भांग, कोकेन,हेरोइन,एमडी सारखे अंमली पदार्थ युवा पिढीपर्यंत वाममार्गाने पोहचवु त्यांचे आयुष्य उद्ध्वस्त करण्याचे काम असामाजिक तत्व वेळोवेळी करीत असतात.परंतु आजचा युवावर्ग जागृक आहे त्यांनी प्रत्येक नशेली पदार्थांपासून सावध रहाले पाहिजे व त्याचा कडाडून विरोध करायला पाहिजे. देशासह जगातील युवावर्गाने २६ जूनला शपथ घेतली पाहिजे की मी माझ्यासाठी, माझ्या परिवारासाठी व देशाच्या भविष्यासाठी यापुढे कोणतीही नशा करणार नाही तेव्हाच खऱ्या अर्थाने आंतरराष्ट्रीय अंमली पदार्थ विरोधी दिवस समजल्या जाईल.कारण ड्रग्सची नशा ही नशा करणाऱ्यांचे आयुष्याची छल्ली तर करतोच सोबतच परिवाराला असमंनजस्यतेमध्ये टाकुन संपूर्ण परिवार विस्कळीत होतो. यामुळे संपूर्ण घर उध्वस्त होते याचे मुख्य कारण म्हणजे फक्त नशा.त्यामुळे कोणतीही नशा म्हणजे आयुष्याचा शेवट ही बाब सर्वांनीच लक्षात ठेवली पाहिजे.कोणतीही नशा असो ती शरीराचा विकास तर करीत नाहीच हालाकी शरिराला ‘छल्ली’ व छिन्नविछिन्न करण्याचे काम करीत असते व स्लोपॉयझनचे काम करून मृत्युला जवळ करीत असते.आपण साधारणतः नशेली वस्तू व पोषक वस्तू यांचा विचार केला तर मनुष्यासाठी नशेली वस्तूंच्या तुलनेत पोषक वस्तू खुपचं स्वस्त असतात. त्यामुळे नशा करणाऱ्यांनी मनावर ताबा ठेवुन नशेली पदार्थांचा विरोध करावा व युवकांनीच जगाला संदेश देवुन नशेली पदार्थांचा निषेध केला पाहिजे. कोणत्याही नशेली वस्तुंसाठी रांगेत उभे रहाने म्हणजे ‘मृत्यूच्या रांगेत‘उभे रहाल्यासारखे आहे. याची जानीव आजच्या युवा पिढीने लक्षात ठेवली पाहिजे. कोणीही कीतीही नशेली वस्तु देण्याचा प्रयत्न केला तरीही आपण जर आपल्या मनावर ताबा ठेवला तर कोणतीही नशेली वस्तु तुम्हाला स्पर्शसुध्द करू शकत नाही हेसुद्धा तेवढेच सत्य आहे.त्यामुळे सध्याच्या परिस्थितीत प्रत्येकांनी आपल्या आयुष्याची काळजी घ्यायला हवी.त्यामुळे कोणत्याही नशेपासुन सावधगिरी बाळगली पाहिजे.आपण सुदृढ रहालो तर आपली पिढी सुदृढ राहील‘ त्याचप्रमाणे ‘आपण सुरक्षीतरीत्या जगलो तर तर देश सुरक्षित राहील, देश सुरक्षित रहाला तर जग अवश्य सुरक्षित होईल.याकरीता अंमली पदार्थ विरोधी दिनाच्या निमित्ताने आपण ‘संकल्प‘ करूया की नशेली वस्तूला टाटा-बाय-बबबरू या.



**रमेश कृष्णराव लांजेवार**
**(स्वतंत्र पत्रकार)**

## दिव्यांगजन सशक्तीकरण पुरस्कारासाठी अर्ज आमंत्रित

**महासागर प्रतिनिधी**
**वर्धा, दि. २५ जून**

केंद्र शासनाच्या सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालयातील दिव्यांगजं सशक्तीकरण विभागाच्या वतीने दिव्यांग व्यक्तींसाठी सन २०२५ साठी देण्यात येणा-या पुरस्कारासाठी १५ जुलैपर्यंत ऑनलाईन अर्ज मागविण्यात आले आहे, इच्छूक पात्र अर्ज व नामांकने केवळ गृह मंत्रालयाने तयार केलेल्या संकेत स्थळावर पासवर्ड स्थळावर पासवर्ड संरक्षित करून सादर करावे, संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या विशिष्ट नमुन्यातील अर्जामधील सर्व मुद्यांची माहिती उल्लेखनीय व प्रेरणादायी सविस्तर वर्णनासह भरावी, समक्ष अथवा पोष्टाद्वारे सादर करण्यात आलेले अर्ज स्वीकारले जाणार नाही, अधिक माहितीसाठी जिल्हा समाजकल्याण अधिकारी प्रतीभा भागवतकर यांच्याशी संपर्क साधावा, असे कळविण्यात आले आहे.

# भारतीय सैनिकांचे बलीदान सदैव स्मरणात राहील- पालकमंत्री डॉ. भोयर

**❒ पालकमंत्र्यांच्याहस्ते शक्ती स्मारकाचे लोकार्पण ❒ विश्रामगृहाजवळील चौकाचे अटल विजय चौक नामकरण**



**महासागर प्रतिनिधी**
**वर्धा, दि. २५ जून**

जिल्ह्यातील रहिवासी असलेल्या भारतीय स्थल, जल व वायु सैन्यदलातील शहीद सैनिकांची ओळख नागरिक व भावी पिढीला व्हावी तसेच देशाकरीता दिलेल्या सर्वोच्च बलिदानाला सन्मानाचे स्थान प्राप्त व्हावे म्हणून स्व. रामदास आंबटकर यांच्या आमदार निधीतून शक्ती स्मारकाची निर्मिती करण्यात आली आहे. या शक्ती स्मारकामुळे भारतीय सैनिकाचे बलिदान सदैव स्मरणात राहील, असे प्रतिपादन पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी केले.

शासकीय विश्रामगृहाजवळ माजी आमदार स्व. रामदास आंबटकर यांच्या निधीतून तयार करण्यात आलेल्या शक्ती स्मारकाचे लोकार्पण पालकमंत्र्यांच्याहस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी माजी खासदार रामदास तडस, जिल्हाधिकारी वान्मथी सी. सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता सतिश अंभोरे, माजी खासदार सुरेश वाघमारे, संजय गाते, सुनील गफाट, प्रशांत बुरले, अतुल तराळे, माजी जिल्हा परिषद सदस्य वसंतराव आंबटकर व माजी सैनिक उपस्थित होते.

देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी देशाच्या इतिहासात अनेक स्वातंत्र्य संग्राम सैनिकांनी आपल्या प्राणाची आहुती देऊन देशाला स्वातंत्र्य मिळवून दिले. देशाचे हे स्वातंत्र्य अविरत कायम टिकवून ठेवण्यासाठी भारत देशाला अनेक अनपेक्षित युध्दांना सामोरे जावे लागले. ज्यामध्ये भारतीय सैन्यातील अनेक सैनिकांनी आपल्या प्राणाचे सर्वोच्च बलीदान देत वीरगती प्राप्त झाली. आज देशातील या सर्व शहीद जवानांचा उल्लेख सन्मानाने देशाची राजधानी दिल्ली येथील राष्ट्रीय युध्द स्मारक येथे नोंदविण्यात आलेला आहे.

या शक्ती स्मारकामुळे जिल्ह्यातील मुळ रहिवासी असलेल्या भारतीय सैन्यात सहभाग नोंदविलेल्या शहीद सैनिकांची ओळख निर्माण होईल, असे पुढे बोलतांना पालकमंत्री डॉ. पंकज भोयर म्हणाले. यावेळी पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या हस्ते शासकीय विश्रामगृहाजवळील चौकाचे विजय चौक म्हणून नामकरण करण्यात आले असून त्याच्या नामफलकाचे लोकार्पण करण्यात आले. कार्यक्रमाला माजी सैनिक, नागरिक मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.

# मेघे अभिमत विद्यापीठाचा आंतरराष्ट्रीय सामंजस्य करार

**❒ शिक्षण व संशोधनाच्या सशक्तीकरणासाठी एक पाऊल ब्रिटन**
**❒ इंडोनेशिया, अमेरिकेतील विद्यापीठे व एसेम एलएलएल हबचा सहभाग**




**महासागर प्रतिनिधी**
**वर्धा, दि. २५ जून**

सावंगी येथील दत्ता मेघे उच्च शिक्षण व संशोधन संस्था अभिमत विद्यापीठाद्वारे आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या चार महत्त्वपूर्ण संस्थांसोबत दीर्घकालीन शिक्षण व संशोधनाच्या आजीवन दृढतेसाठी सामंजस्य करार करण्यात आला. यात युनायटेड किंगडममधील सुमारे शंभर वर्षांची शैक्षणिक परंपरा असलेली हल युनिव्हर्सिटी, इंडोनेशियातील एसा उंगुल युनिव्हर्सिटी, अमेरिकेतील वेस्टर्न मिशिगन युनिव्हर्सिटी आणि आशिया युरोप मीटिंग एज्युकेशन अँड रिसर्च हब या अधिकृत विद्यापीठांचा व संस्थेचा समावेश आहे.

दत्ता मेघे उच्च शिक्षण व संशोधन संस्था अभिमत विद्यापीठाचे कुलपती दत्ता मेघे, मुख्य सल्लागार डॉ. वेदप्रकाश मिश्रा व प्रधान सल्लागार सागर मेघे यांच्या मार्गदर्शनाखाली जागतिक कार्यकारी संचालक डॉ. संदीप श्रीवास्तव, उपसंचालक डॉ. आदित्य केकतपुरे, डॉ. रोमा मोरघडे, भुवनेश्वरी एम आणि कार्यकारी सहाय्यक निहारिका मुंजेवार यांनी हा सामंजस्य करार पूर्णत्वाला नेला.

या धोरणात्मक सामंजस्य कराराद्वारे शिक्षणावरील तुलनात्मक संशोधनात निपुणता आणि संशोधनावर आधारित शिक्षण धोरण राबविणे, परस्परात अभ्यासक्रम विकसित करणे, शिक्षक आणि विद्यार्थ्यांचे आदानप्रदान सुलभ करणे, आयुर्विज्ञान, तंत्रज्ञान आणि समाजविज्ञान यासारख्या क्षेत्रात संयुक्तरित्या संशोधनकार्य करणे आणि आजीवन शिक्षणाला प्रोत्साहन देणारी जागतिक चर्चासत्रे व कार्यशाळा आयोजित करणे, या उद्दिष्टांना प्राधान्य देत मेघे अभिमत विद्यापीठाने शिक्षण व संशोधनाच्या सशक्तीकरणासाठी हे महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे.

# आजपासून किरण ठाकरे यांचे बेमुदत अन्नत्याग उपोषण सुरु

**ए.पी.एम.सी. समोरील नाली हटवून रोड मोठा करण्याची मागणी**

**महासागर प्रतिनिधी**
**देवळी, दि. २५ जून**

देवळी ते वर्धा हा देवळी शहरातला प्रमुख मार्ग नॅशनल हायवे अथॉरिटी च्या चुकीच्या नियोजनमुळे अरुंद व धोक्याचा झाला आहे. या मार्गावरून दहेगाव-वायगाव राज्य महामार्ग क्र. ३२२ जातो. याच मार्गावर कृषी उत्पन्न बाजार समिती, खरेदी विक्री संस्था, एम.आय.डी.सी., जिनिंग फॅक्ट्री, तंत्रशिक्षण शाळा, कॉलेज, मागासवर्गीय वसतिगृह व ग्रामिण रुग्णालय आहे. भविष्यातील धोके लक्षात घेता अनेक निवेदने व तक्रारी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी व प्रशासनाकडे केल्या मात्र कुठलीही कारवाही होत नसल्याने अखेर आजपासून




देवळी येथील आठवडी बाजार चौकात युवा संघर्ष मोर्चाचे अध्यक्ष किरण ठाकरे यांनी बेमुदत अन्नत्याग उपोषण सुरु केले. दुपारी बारा वाजता सर्वप्रथम शहीद अशोक गेडाम स्मारकाचे व स्वातंत्र्य संग्राम सेनानी यांच्या स्मारकाला अभिवादन करून किरण ठाकरे उपोषण स्थळी दाखल झाले. यावेळी देवळीतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आमच्या मागणीकडे दुर्लक्ष केल्यामुळे रस्त्याच्या एका बाजूची नाली हटवून रस्ता माध्यभागी व प्रशस्त करावा या मागणीसाठी आजपासून उपोषण सुरु करीत असल्याचे किरण ठाकरे यांनी सांगितले.

जोपर्यंत देवळीकर जनतेची मागणी प्रशासन मान्य करीत नाही तोपर्यंत अन्नत्याग उपोषण सुरूच राहणार असल्याचे त्यांनी सांगितले. आज उपोषण मंडपात देवळी पत्रकार संघाच्या सर्व पत्रकार बांधवांनी उपस्थित राहून या उपोषणाला पाठिंबा दिला तसेच व्यापारी संघटनेचे पदाधिकारी अशोक पवार व हारून तंवर यांनी सुद्धा उपोषणाला पाठिंबा दिला उपोषण स्थळी अशोक राऊत, प्रविण कात्रे, गौतम पोपटकर,ॲड. मंगेश घुंगरूड, संदीप दिघीकर, लोमहर्ष बाळबुधे, रुपराव खैरकार, आसिफ शेख, दिलीप वाघमारे, नदीम शेख, स्वप्नील मदणकर, मनीष पेटकर, चंद्रभान इटणकर, अरुण येनूरकर, प्रविण तराळे, दिलीप वाघमारे, बबलू राऊत, मंगेश वानखेडे, अफसर शेख, संदीप ठाकरे, स्वप्नील ठाकरे,ऋषी येनूरकर,सागर पाटणकर यांच्या सह नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थित होती.

## अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना वसतीगृहात प्रवेश आमंत्रित

**महासागर प्रतिनिधी**
**वर्धा, दि. २५ जून**

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयांतर्गत जिल्ह्यात अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी वर्धा प्रकल्पांतर्गत ७ मुलांचे व ५ मुलींचे असे एकुण १२ वसतीगृहे कार्यरत आहे. यात जिल्हास्तरावरील ४ तर तालुकास्तरावरील ८ वसतीगृहाचा समावेश आहे. या वसतीगृहामध्ये रिक्त असलेल्या प्रवेशासाठी ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहे. शैक्षणिक सत्र २०२५-२६ साठी आदिवासी मुला मुलींच्या शासकीय वसतीगृहात प्रवेशाकरीता ऑनलाईन पध्दतीने अर्ज करता येईल. वसतीगृहामध्ये प्रवेशासाठी प्रीमॅट्रीक, कनिष्ठ महाविद्यालय ते पदवी, पदव्युत्तर व्यावसायिक अभ्यासक्रमाकरीता या संकेतस्थळावर अर्ज करता येईल. अर्ज प्रवेशाबाबतची सुचना संकेतस्थळावर वेळोवेळी प्रदर्शित करण्यात येते. प्रवेश प्रक्रिया गुणवत्ता तथा नियमानुसार करण्यात येईल. वसतीगृहात रिक्त जागेच्या अधिन राहुन प्रवेश देण्यात येणार आहे. १२ वी नंतर जिल्हास्तरावरील वसतीगृहाकरीता ऑनलाईन अर्ज भरलेल्या विद्यार्थ्यांना वसतीगृहात प्रवेश न मिळाल्यास पंडित दिनदयाल उपाध्याय स्वयंम योजनेत वळती करण्यात येणार आहे.प्रवेश प्रक्रिये संबंधी अधिक माहिती एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयात उपलब्ध आहे, तसेच संबंधीत वसतीगृहाचे गृहपाल यांचेशी संपर्क साधावा, असे एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी दिपक हेडाऊ यांनी कळविले आहे.




# पद्मश्री चितमपल्ली यांचे कार्य नव्या पिढीसाठी प्रेरणादायी : पोलीस अधीक्षक अनुराग जैन

**❒ पद्मश्री मारुती चितमपल्ली यांच्या स्मरणार्थ अस्थीपूजन ❒ पदयात्रा व वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन**



**महासागर प्रतिनिधी**
**वर्धा, दि. २५ जून**

अरण्य ऋषी म्हणून ओळखले जाणारे पद्मश्री मारुती चितमपल्ली यांनी जीवनभर पर्यावरण आणि जंगलाचे संरक्षण व संवर्धनासाठी कार्य केले. त्यांनी जंगलात वास्तव करून अनेक महत्त्वपूर्ण पुस्तके लिहिली. सामान्य जनतेला झाडे, वनस्पती आणि वन्यजीवांचे महत्त्व पटवून दिले. त्यांचे कार्य नव्या पिढीसाठी प्रेरणादायी आहे, असे विचार वर्ध्याचे जिल्हा पोलीस अधीक्षक अनुराग जैन यांनी व्यक्त केले.

पद्मश्री चितमपल्ली यांच्या अस्थीपूजन आणि पदयात्रेचा कार्यक्रम वर्धा वनपरिक्षेत्र कार्यालयात बुधवार, २५ जून रोजी आयोजित करण्यात आला होता. यावेळी श्रद्धांजली अर्पण करताना ते बोलत होते.

या कार्यक्रमाला विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष प्रदीप दाते, उपवनसंरक्षक हरवीर सिंह, सामाजिक वनीकरण विभागाचे उपवनसंरक्षक सुहास बढेकर, दत्ता मेघे आयुर्विज्ञान संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संजय इंगळे तिगावकर, वन्यजीव प्रतिपालक कौशल मिश्र, निसर्ग सेवा समितीचे अध्यक्ष मुरलीधर बेलखोडे, महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालयाचे जनसंपर्क अधिकारी बी. एस. मिरगे, पिपल्स फॉर ॲनिमल्सचे आशिष गोस्वामी, वैद्यकीय जनजागृती मंचाचे अध्यक्ष डॉ. सचिन पावडे आदी मान्यवर उपस्थित होते.

पद्मश्री मारुती चितमपल्ली २०१७ ते २०२० या कालावधीत वर्ध्याच्या महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापीठात वास्तव्यास होते. काही काळ त्यांनी निवासी लेखक म्हणूनही काम केले होते. १८ जून २०२५ रोजी सोलापूर येथे वयाच्या ९३ व्या वर्षी त्यांचे निधन झाले. त्यांच्या अस्थी वर्ध्याला वन्यजीव प्रतिपालक कौशल मिश्र यांच्या माध्यमातून आणण्यात आल्या होत्या. वर्ध्यातील नागरिकांनी त्यांच्या अस्थींचे दर्शन घेऊन त्यांना श्रद्धांजली अर्पण केली.

चितमपल्ली यांच्या स्मृतीप्रित्यर्थ वनपरिक्षेत्र कार्यालयापासून पोस्ट ऑफिस चौक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, गांधी पुतळा मार्गे वनपरिक्षेत्र कार्यालयापर्यंत पदयात्रा काढण्यात आली. त्यानंतर अस्थीपूजन आणि शोकसभा आयोजित करण्यात आली. या वेळी सर्व वक्त्यांनी चितमपल्ली यांच्या कार्यावर आणि वर्ध्यातील पर्यावरणप्रेमींशी त्यांच्या सान्निध्याबाबत आठवणी सांगितल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपवनसंरक्षक हरवीर सिंह यांनी केले. त्यानंतर चितमपल्ली यांच्या स्मृतीप्रित्यर्थ वृक्षारोपणही करण्यात आले.

या कार्यक्रमाला बोर व्याघ्र प्रकल्पाच्या उपसंचालक सोनल कामडी, वनपरिक्षेत्र अधिकारी वैशाली भलावी, वनपरिक्षेत्र अधिकारी रूपेश खेडकर, अर्चना नौकरकर, पूनम ब्राह्मणे, वनरक्षक माधव माने आणि अरुण गीते, ॲड. नीलकंठ हुड, ॲड. ताम्रध्वज बोरकर, मनोहर लांडगे, नंदकुमार वानखेडे, राजदीप राठोड, राहुल तेलरांधे, उज्वला घोडे यांच्यासह वनविभागाचे अधिकारी, कर्मचारी व पर्यावरणप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विनोद वाघ यांनी पर्यावरण गीत सादर केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नेहा तिवसकर यांनी केले.

**चौकशीची जाहीर नोटीस**

अर्ज क्र. १२३/२०२५/कलम-१९

अर्जदार : श्रीमती जयश्री धर्मेंद्र वाणी

जा. क्र./ न्याय/८९०/२०२५
पत्ता : सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, वर्धा,
राजेश नरहरशेट्टीवार यांची इमारत, दुसरा माळा,
हिरो होंडा शोरूमच्या मागे, मोहन नगर, नागपुर रोड, वर्धा.

**सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी कमांक : क्रांतीज्योती महिला कल्याण सेवा ट्रस्ट सुखमणी नगर हिंगणघाट, ता. हिंगणघाट, जि. वर्धा**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, धर्मदाय उपआयुक्त/, सहायक धर्मदाय आयुक्त, वर्धा विभाग वर्धा हे वर नमूद केलेल्या नोंदणी अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सर्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यावर चौकशी करणार आहेत. १) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय ?आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय?२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय?

**(अ) जंगम मिळकत : ११०००/- रू. ट्रस्ट जवळ जमा आहे.**

**(ब) स्थावर मिळकत (वर्णन) : -----(निरंक)--------**

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून ३० दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठविणे,नंतर आलेल्या कैफियतींचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजुन चौकशी पुर्ण केली जाईल व नोंदणी अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील. ही नोटीस माझे सहीनिशी व मा. सहायक धर्मादाय आयुक्त, वर्धा कार्यालयाचे शिक्यानिशी आज दिनांक २०-०६-२०२५ रोजी दिली.

ठिकाण : वर्धा

दिनांक : २६/०६/२०२५

शिक्का

अधिक्षक
(न्याय शाखा)
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
वर्धा विभाग वर्धा

## वर्धा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित वर्धा

तृतीय अनुसूची नमुना अ (कलम 29) ताळेबंद पत्रक बँकींग रेग्युलेशन ॲक्ट 1949 नुसार 31.03.2025 अखेर

| मागील वर्षाचे आकडे 31.03.2024 रूपये पैसे | भांडवल व देणे | रूपये पैसे | चालू वर्षाचे आकडे 31.03.2025 रूपये पैसे |
|---|---|---|---|
| **50,00,00,000.00** | **1) भाग भांडवल** | | **50,00,00,000.00** |
| | अधिकृत भाग भांडवल | | |
| | 'अ' वर्ग शासकीय | | |
| 12,50,00,000.00 | 1,25,000 शेअर्स प्रत्येकी 1,000 रू. चे | 12,50,00,000.00 | |
| | 'ब' वर्ग सहकारी संस्था | | |
| 37,48,60,000.00 | 3,74,860 शेअर्स प्रत्येंकी 1,000 रू. चे | 37,48,60,000.00 | |
| | 'क' वर्ग वैयक्तिक | | |
| 1,40,000.00 | 140 शेअर्स प्रत्येकी 1,000 रू. चे | 1,40,000.00 | |
| | | | |
| **35,97,72,000.00** | **वसुल झालेले भाग भांडवल** | | **35,88,14,200.00** |
| 7,19,00,000.00 | 'अ' वर्ग शासकीय | 7,09,00,000.00 | |
| | 'ब' वर्ग सहकारी संस्था | | |
| 28,78,41,000.00 | 57,55,384 शेअर्स प्रत्येकी 50 रू. चे व 114 शेअर्स रू.1000 चे | 28,78,83,200.00 | |
| | 'क' वर्ग वैयक्तिक | | |
| 31,000.00 | 124 शेअर्स प्रत्येकी 250 रू. चे | 31,000.00 | |
| **5,06,07,23,431.57** | **2) बचत फंड व इतर फंड** | | **4,93,78,61,455.07** |
| 7,09,19,728.78 | 1) बचत फंड | 7,09,19,728.78 | |
| 1,95,34,229.00 | 2) शेतीपत स्थिरता निधी | 2,01,20,256.00 | |
| 1,26,35,129.48 | 3) इमारत फंड | 1,26,35,129.48 | |
| 1,20,77,30,000.00 | 4) शेअर कॅपिटल डिपॉझिट खाते ( राज्य सरकार) | 1,20,77,30,000.00 | |
| 22,17,00,000.00 | 5) शेअर कॅपिटल डिपॉझिट खाते ( केंद्र सरकार) | 22,17,00,000.00 | |
| 11,08,00,000.00 | 6) शेअर कॅपिटल डिपॉझिट खाते ( नाबार्ड) | 11,08,00,000.00 | |
| - | 7) स्पेशल बॅड डेब्ट फंड | - | |
| 2,66,25,50,000.00 | 8) वाईट व संशयीत कर्ज निधी | 2,53,93,22,000.00 | |
| 8,610.00 | 9) इन्व्हेस्टमेंट डिप्रीशिएशन फंड (शेअर्स) | - | |
| - | 10) गर्व्हनमेन्ट सेक्युरीटी अमॉरटायझेशन | - | |
| 6,24,000.00 | 11) स्टॅंडर्ड असेटची तरतूद | 6,47,000.00 | |
| 25,00,00,000.00 | 12) होमट्रेड कंपणी कडून येणे रक्कमेची तरतूद | 25,00,00,000.00 | |
| 1,43,75,310.69 | 13) इतर एन.पी.ए. असेट ची तरतुद | 1,41,40,917.19 | |
| 1,28,13,000.00 | 14) होमट्रेड कंपणी कडून येणे रक्कमेवर व्याज | 1,28,13,000.00 | |
| 46,91,72,423.62 | 15) एसेट रिव्हॅलुएशन फंड खाते | 46,91,72,423.62 | |
| 78,61,000.00 | 16) एसबीएन नोट् तरतुद | 78,61,000.00 | |
| **1,69,500.00** | 3) प्रिन्सीपल स्टेट पार्टनरशिप फंड | | **1,69,500.00** |
| 1,69,500.00 | प्राथमिक शेती सहकारी संस्था | 1,69,500.00 | |
| **3,38,62,93,816.72** | **4) ठेवी** | | **3,38,49,47,893.18** |
| 40,87,91,672.11 | 1) मुदत ठेवी अ) वैयक्तिक | 45,33,38,735.57 | |
| 56,23,02,826.05 | ब) सहकारी संस्था | 60,77,08,364.70 | |
| 1,32,39,93,403.25 | 2) बचत ठेवी अ) वैयक्तिक | 1,23,83,49,085.70 | |
| - | ब) सहकारी संस्था | - | |
| 98,70,90,042.63 | 3) चालू ठेवी अ) वैयक्तिक | 98,71,84,535.15 | |
| 10,41,15,872.68 | ब) सहकारी संस्था | 9,83,67,172.06 | |
| - | **5) राज्य सहकारी बँकेकडून घेतलेले कर्जे** | | - |
| - | 1) अल्प मुदत कर्ज | - | |
| -- | 2) मध्यम मुदती कर्जे | - | |
| -- | 3) दिर्घ मुदत कर्जे | - | |
| - | **6) वसुलीसाठी आलेले चेक्स व हुंडया** | - | - |
| | (उलट बाजु प्रमाणे) | | |
| - | **7) केंद्र शासनाकडून कर्ज माफी येणे** | - | - |
| 39,501.40 | **8) शाखा व्यवहाराबाबत** | **19,557.40** | **19,557.40** |
| **69,12,36,000.00** | **9) थकीत व्याजाकरिता तरतुद** | **40,00,79,000.00** | **40,00,79,000.00** |
| **4,32,76,733.40** | **10) देणे असलेले व्याज** | **4,65,05,820.07** | **4,65,05,820.07** |
| **3,33,89,156.97** | **11) इतर देणे** | | **3,34,69,296.50** |
| 37,10,609.97 | अ) सस्पेन्स खाते | 40,22,458.02 | |
| 15,177.00 | ब) शेअर्स सस्पेन्स खाते | - | |
| 2,96,63,370.00 | क) इतर देणी | 2,94,46,838.48 | |
| -- | **12) नफा** | - | - |
| | | | |
| **9,57,49,00,140.06** | **एकुण बेरीज** | **9,16,18,66,722.22** | **9,16,18,66,722.22** |
| - | | - | - |

ऐ. डी. बोडखे — विभाग प्रमुख (लेखा)
एस. जी. कोरडे — मुख्य कार्यकारी अधिकारी(प्र)
आर.डी.कौसडीकर — अध्यक्ष, प्राधिकृत अधिकारी समिती

## वर्धा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित वर्धा

तृतीय अनुसूची नमुना अ (कलम 29) ताळेबंद पत्रक बँकींग रेग्युलेशन ॲक्ट 1949 नुसार 31.03.2025 अखेर

| मागील वर्षाचे आकडे 31.03.2024 रूपये पैसे | जिंदगी व येणे | रूपये पैसे | चालू वर्षाचे आकडे 31.03.2025 रूपये पैसे |
|---|---|---|---|
| **63,28,876.65** | **1) रोख शिल्लक** | **49,57,890.59** | **15,68,77,652.57** |
| 26,37,61,635.76 | स्टेट बँक ऑफ इंडिया | 15,19,19,761.98 | |
| | सेन्ट्रल बँक ऑफ इंडिया, आयसीआयसीआय बँक, बँक ऑफ इंडिया, | | |
| | आयडीबीआय बँक व राज्य सहकारी बँकेतील शिल्लक | | |
| | | | |
| **3,08,68,17,965.00** | **2) गुंतवणूक** | | **3,34,71,65,157.00** |
| 1,000.00 | 1) सेन्ट्रल वेअर हाउसिंग | - | |
| - | 2) स्टेट बँक ऑफ इंडिया | - | |
| - | 3) आयसीआयसीआय बँक | - | |
| 2,99,00,610.00 | 4) राज्य सहकारी बँक व इतर सहकारी संस्थेचे शेअर | 2,98,98,000.00 | |
| 1,43,14,93,105.00 | 5) राज्य सहकारी बँकेत गुंतवणूक | 1,68,49,97,407.00 | |
| 10,31,49,500.00 | 6) इतर गुंतवणूक | 10,36,76,000.00 | |
| 1,52,22,73,750.00 | 7) सरकारी रोख्यातील गुंतवणूक | 1,52,85,93,750.00 | |
| **1,69,500.00** | **3) प्रिन्सीपल स्टेट पार्टनरशीप फंडाची गुंतवणूक** | | **1,69,500.00** |
| 1,69,500.00 | प्राथमिक शेती सहकारी संस्था | 1,69,500.00 | |
| **2,81,90,29,342.54** | **4) कर्जे** (पैकी थकीत रू.25423.02 लाख) | | **2,70,54,38,325.30** |
| **2,38,71,27,617.87** | **अ) अल्प मुदती कर्जे** | **2,27,90,43,470.35** | |
| 2,01,83,37,688.85 | 1) शेती कर्जे (पैकी थकीत रू.20129.78 लाख) | 2,01,70,16,824.10 | |
| 36,87,89,929.02 | 2) बिगर शेती कर्जे (पैकी थकीत रू.2081.57 लाख) | 26,20,26,646.25 | |
| **33,57,09,091.60** | **ब) मुध्यम मुदती कर्जे** | **33,03,44,484.88** | |
| 16,78,38,708.79 | 1) शेती कर्जे (पैकी थकीत रू.1676.22 लाख) | 16,76,21,928.79 | |
| 16,78,70,382.81 | 2) बिगर शेती कर्जे (पैकी थकीत रू.574.95 लाख) | 16,27,22,556.09 | |
| **9,61,92,633.07** | **क) दिर्घ मुदती कर्जे** | **9,60,50,370.07** | |
| 49,72,081.00 | 1) शेती कर्जे (पैकी थकीत रू.49.72 लाख) | 49,72,081.00 | |
| 9,12,20,552.07 | 2) बिगर शेती कर्जे (पैकी थकीत रू.910.78 लाख) | 9,10,78,289.07 | |
| **69,18,01,258.64** | **5) येणे असलेले व्याज** (पैकी थकीत रू.4000.79 लाख ) | **40,04,86,272.89** | **40,04,86,272.89** |
| -- | **6) वसुलीसाठी आलेले चैक्स व हुंडया** | - | - |
| - | **( उलट बाजु प्रमाणे)** | - | - |
| -- | **7) शाखा व्यवहाराबाबत** | - | - |
| **45,43,34,423.52** | **8) इमारत (घसारा वजा जाता)** | **45,19,85,872.52** | **45,19,85,872.52** |
| **59,444.74** | **9) फर्निचर (घसारा वजा जाता)** | **(0.03)** | **(0.03)** |
| - | **10) जीप (घसारा वजा जाता)** | - | - |
| **2,11,883.35** | **11) शिल्लक प्रिन्टींग स्टेशनरी स्टॉक** | **1,78,279.05** | **1,78,279.05** |
| **42,41,27,015.85** | **12) इतर संप्पती** | **39,74,05,496.04** | **39,74,05,496.04** |
| **1,82,82,58,794.01** | **13) तोटा** | **1,70,21,60,166.88** | **1,70,21,60,166.88** |
| **9,57,49,00,140.06** | **एकुण बेरीज** | **9,16,18,66,722.22** | **9,16,18,66,722.22** |

ऐ. डी. बोडखे — विभाग प्रमुख (लेखा)
एस. जी. कोरडे — मुख्य कार्यकारी अधिकारी(प्र)
आर.डी.कौसडीकर — अध्यक्ष, प्राधिकृत अधिकारी समिती

## वर्धा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित वर्धा

सन २०२४–२०२५ नफा तोटा पत्रक

| उत्पन्न | 31.03.2024 | 31.03.2025 |
|---|---|---|
| **1) ठेवी व कर्जावरील व्याज** | | |
| अ) कर्जे | 2,32,71,587.50 | 1,76,00,115.28 |
| ब) गुंतवणूक | 22,22,96,531.60 | 24,68,70,236.68 |
| क) डिव्हीडंट | 30,00,050.00 | 30,00,050.00 |
| **2) कमिशन** | | |
| बिल्स चेक्स | - | - |
| **3) इतर उत्पन्न** | | |
| 1) इन्सिडेन्टल चार्जेस | 1,23,35,447.64 | 2,608.87 |
| 2) किरकोळ | 10,12,514.36 | 9,07,619.60 |
| 3) लॉकर्स भाडे | 6,39,747.56 | 4,31,015.00 |
| 4) इमारत भाडे | 4,37,680.00 | 4,67,040.00 |
| 5) जादा तरतुद | 15,77,50,540.00 | 12,93,35,408.86 |
| 6) गुंतवणूक विक्रीतून प्राप्त नफा | 17,75,000.00 | 35,20,000.00 |
| | - | - |
| **4) तोटा** | - | - |
| एकुण बेरीज | **42,25,19,098.66** | **40,21,34,094.29** |

| खर्च | 31.03.2024 | 31.03.2025 |
|---|---|---|
| 1) ठेवी व घेतलेल्या कर्जावरील व्याज | 6,58,87,734.04 | 9,67,59,981.74 |
| 2) पगार, भत्ता व प्रोव्हीडंट फंड | 5,23,51,886.70 | 5,38,68,839.00 |
| 3) कर्मचारी प्रवास भत्ता खर्च | 1,55,956.00 | 2,34,230.00 |
| 4) इमारत भाडे, कर, विमा व विज खर्च | 43,86,038.00 | 47,93,954.21 |
| 5) वकील फी | 2,11,500.00 | 1,83,000.00 |
| 6) पोस्टेज, टेलिग्राम व टेलिफोन | 2,80,526.20 | 2,56,669.70 |
| 7) ऑडीट फी | 40,000.00 | 72,000.00 |
| 8) स्टेशनरी, छपाई व जाहीरात | 2,68,073.93 | 2,84,648.80 |
| 9) इमारत, जीप, फर्निचर वरील घसारा व दुरूस्ती | 24,25,791.00 | 24,07,995.77 |
| 10) निर्लेखित खर्च | 1,90,11,761.63 | 8,73,57,836.05 |
| 11) आयकर | - | 1,57,07,798.00 |
| 12) इतर खर्च | 38,78,519.31 | 39,04,887.89 |
| 13) तरतुदी | 93,81,438.00 | 1,02,03,626.00 |
| **14) निव्वळ नफा** | **26,42,39,873.85** | **12,60,98,627.13** |
| | | |
| एकुण बेरीज | **42,25,19,098.66** | **40,21,34,094.29** |
| | - | - |

ऐ. डी. बोडखे — विभाग प्रमुख (लेखा)
एस. जी. कोरडे — मुख्य कार्यकारी अधिकारी(प्र)
आर.डी.कौसडीकर — अध्यक्ष, प्राधिकृत अधिकारी समिती

## The Wardha District Central Co-operative Bank Ltd., Wardha

As per Reserve Bank of India letter No. RPCD.C.O.RF.BC
No.44 / 07 / 38.03 / 2005-06 Dated 10.10.2005

*(Amt in Lakh)*

### Annexure

| Sr. No. | Particulars | 31.03.2024 | 31.03.2025 |
|---|---|---|---|
| 1 | Investment (Only SLR ) | | |
| | a. Book value and face value of Investment | 15222.74 | 15285.94 |
| | b. Market value Investment | 15304.17 | 15750.22 |
| 2 | Advance to Directors, their Relatives Companies/ Firm in which they are interested | | |
| | a. Fund-based | --- | --- |
| | b. Non-fund based (Guarantees, L/C, etc. | --- | --- |
| 3 | Cost of Deposit (Average cost of Deposits) | 1.96 | 2.88 |
| 4 | NPAs | | |
| | a) Gross NPA | 26631.21 | 25422.93 |
| | b) Net NPA | 5.71 | 29.71 |
| | c) % of Gross NPA to Total Advances | 94.47 | 93.97 |
| | d) % of Net NPA to Net Advances | 0.37 | 1.79 |
| 5 | Movement of NPAs | | |
| | Movement of Gross NPAs | | |
| | a) Opening Balance | 28141.77 | 26631.21 |
| | b) Additions during the year | 48.17 | 56.62 |
| | c) Reductions during the year | 1558.73 | 1264.90 |
| | d) Closing Balance | 26631.21 | 25422.93 |
| | Movement of Net NPAs | | |
| | a) Opening Balance | 41.52 | 5.71 |
| | b) Additions during the year | --- | 24.00 |
| | c) Reductions during the year | 35.81 | --- |
| | d) Closing Balance | 5.71 | 29.71 |
| | Movement of Provisions for NPAs (Excl. Provision for Std. Asset) | | |
| | a) Opening Balance | 28100.25 | 26625.50 |
| | b) Additions during the year | --- | --- |
| | c) Reductions during the year | 1474.75 | 1232.28 |
| | d) Closing Balance | 26625.50 | 25393.22 |
| 6 | Profitability | | |
| | a) Interest income as a % of Working fund | 3.41% | 3.72% |
| | b) Non-interest income as a % of Working fund | 2.46% | 1.94% |
| | c) Operating Profit as a % of Working fund | 3.67% | 1.78% |
| | d) Return of Assets | 3.41% | 3.72% |
| | e) Business (Deposit + Advances) per employee | 747.63 | 823.03 |
| | f) Profit per employee | 31.84 | 17.04 |
| 7 | Provisions | | |
| | a) Provision on NPA Required to be made | 26625.50 | 25393.22 |
| | b) Provision on NPA actually made | 26625.50 | 25393.22 |
| | c) Provision required to be made in respect of overdue interest taken into income account, gratuity fund, provident fund, arrears in Reconciliation of inter br. Account | 6912.36 | 4000.79 |
| | d) Provision actually made in respect of – Overdue interest, Overdue interest taken into account – Gratuity fund, Provident Fund and Arrears – Provident Fund | 6912.36 | 4000.79 |
| | e) Reconciliation of inter Br. Account – pending entry | --- | ---- |
| | f) Provision Required to be made on Depreciation in Investment | 0.04 | 0.00 |
| | g) Provision actually made on Depreciation in Investment | 0.09 | 0.00 |
| 8 | Movement in Provision | | |
| | a) Towards NPA | | |
| | a) Opening Balance | 28100.25 | 26625.50 |
| | b) Additions during the year | --- | --- |
| | c) Reductions during the year | 1474.75 | 1232.28 |
| | d) Closing Balance | 26625.50 | 25393.22 |
| | b) Towards depreciation on Investment | --- | --- |
| | c) Towards standard Assets | 0.63 | 0.23 |
| | d) Towards all other items under 7 above (Overdue Interest) | (-)102.39 | (-)2911.57 |
| 9 | Payment of Insurance premium to the DICGC including arrears, if any | | |
| 10 | Penalty imposed by RBI for any violation | No | No |
| 11 | Information on Extent of arrears in Reconciliation on inter Bank Account | | |

Item 9:

| Period Upto | Deposit Assessable | Premium (Incl. Taxes) | Paid on Date |
|---|---|---|---|
| March 2025 | 32751.85 Lakh | Rs.23.19 lakh | 18.11.2024 |
| Sept 2025 | 32657.09 Lakh | Rs.23.12 lakh | 26.05.2025 |

Item 11: Inter Bank Adjustment (31.03.2025)

| Period | Credit No. of Entry | Credit Amt | Debit No. of Entry | Debit Amt |
|---|---|---|---|---|
| Below 6 month | 8 | 34.00 | 1 | 0.32 |
| 6 month to 3 year | 6 | 0.31 | 0 | 0.00 |
| Above 3 year | 2 | 0.25 | 0 | 0.00 |
| **Total** | **16** | **34.56** | **1** | **0.32** |

## Notes on Accounts (Dated 31 March 2025)

### (i) Issuer Composition of Non-SLR Investments

Rs.in Lakh

| No. | Issuer | Amount | Extent of 'Below Investment Grade' Securities | Extent of 'Unrated' Securities | Extent of 'Unlisted' Securities |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 1 | PSUs | - | - | - | - |
| 2 | FIs | - | - | - | - |
| 3 | Public Sector Banks | 297.93 | - | - | - |
| 4 | Mutual Funds | - | - | - | - |
| 5 | Others | 1.05 | - | - | - |
| 6 | Provision held towards depreciation | 0.00 | - | - | - |

### (ii) Non-Performing Non-SLR Investments

Rs.in Lakh

| Particulars | Amount |
|---|---|
| Opening Balance | 0.04 |
| Additions during the year since 1st April | 0.00 |
| Reductions during the above period | 0.04 |
| Closing Balance | 0.00 |
| Total Provisions held | 0.00 |

**Annex III**

**Disclosure in Financial Statements – 'Notes to Account'**

**1) Asset Liability Management**

**Maturity patter of certain items of assets and liabilities for the year 2024-25**

(Amount in Lakh)

| | Day 1 | 2 to 7 days | 8 to 14 days | 15 to 30 days | 31 days to 2 month | Over 2 months and up to 6 month | Over 6 months and upto 3 years | Over 3 Years and upto 5 years | Over 5 years | Total |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Deposits | 1,085.55 | 1,857.52 | 1,651.29 | 231.79 | 809.02 | 1,510.62 | 23,115.35 | 33.01 | 3,555.33 | 33,849.48 |
| Advances | - | - | 3.08 | 3.77 | 9.91 | 578.13 | 478.08 | 588.19 | 25,393.22 | 27,054.38 |
| Investments | - | - | 1,100.00 | 327.56 | 11,149.97 | 3,200.00 | 3,582.90 | 1,661.10 | 12,450.12 | 33,471.65 |
| Borrowings | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| Foreign Currency assets | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| Foreign Currency liabilities | - | - | - | - | - | - | - | - | - | - |

**2) Movement of Provisions for Depreciation and Investment Fluctuation Reserve FY 2024-25**

(Amount in Lakh)

| Particular | Current Year | Previous Year |
|---|---|---|
| i) Movement of provisions held towards depreciation on investments | | |
| a) Opening balance\ | 0.09 | 0.09 |
| b) Add : Provisions made during the year | 0.00 | 0.00 |
| c) Less : Write off / write back of excess provisions during the year | 0.09 | 0.00 |
| d) Closing balance | 0.00 | 0.09 |
| ii) Movement of Investment Fluctuation Reserve (IFR) | | |
| a) Opening balance\ | 0.00 | 0.00 |
| b) Add : Amount | 0.00 | 0.00 |
| c) Less : Drawdown | 0.00 | 0.00 |
| d) Closing balance | 0.00 | 0.00 |
| iii) Closing balance in IFR as a percentage of closing balance of investment in AFS and HFT/Current category | 0.00 | 0.00 |

**3) Sale and transfers to/from HTM category/Permanent Category**

(Amount Rs.in Lakh)

| Particular | Current Year 2024-25 | | | Previous Year 2023-24 | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | No. of Security | Book Value | Market Value | No. of Security | Book Value | Market Value |
| **a) Opening balance of HTM Category Securities 1st April** | 12 | 6,408.11 | 6,232.97 | 14 | 7,353.36 | 7,006.16 |
| b) Transfer to AFS Category (-) | - | - | - | 2 | 945.25 | 959.90 |
| c) Transfer from AFS Category to HTM Category (+) | - | - | - | - | - | - |
| d) Sale of HTM Category Securities (-) | - | - | - | - | - | - |
| e) Purchase during year and hold in HTM Category (+) | - | - | - | - | - | - |
| f) Market Value Increase/Decrease of Pervious Year hold Securities (+/-) | - | - | 212.58 | - | - | 186.71 |
| **g) Closing balance of HTM Category Securities 31st March** | 12 | 6,408.11 | 6,445.55 | 12 | 6,408.11 | 6,232.97 |

**4) Sector-wise Advance and Gross NPAs**

(Amount Rs.in Lakh)

| Sr. No. | Particular | Current Year 2024-25 | | | Previous Year 2023-24 | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Outstanding Total Advance | Gross NPAs | % of Gross NPAs to Total Adv. in that Sector | Outstandin g Total Advance | Gross NPAs | %of Gross NPAs to Total Adv. in that Sector |
| i) | **Priority Sector** | | | | | | |
| a) | Agriculture and allied activities | 21,896.11 | 21,855.72 | 99.82% | 21,911.49 | 21,911.49 | 100.00% |
| b) | Advance to industries sector eligible as priority sector lending | - | - | 0.00% | - | - | 0.00% |
| c) | Services | 323.12 | 323.12 | 100.00% | 330.07 | 330.07 | 100.00% |
| d) | Personal Loan | 600.35 | 9.63 | 1.60% | 681.53 | 16.96 | 2.49% |
| | **Sub-total (i)** | **22,819.58** | **22,188.47** | **97.23%** | **22,923.09** | **22,258.52** | **97.10%** |
| ii) | **Non-priority Sector** | | | | | | |
| a) | Agriculture and allied activities | - | - | 0.00% | - | - | 0.00% |
| b) | Industry | 2,728.90 | 2,728.90 | 100.00% | 3,612.60 | 3,612.61 | 100.00% |
| c) | Services | 113.71 | 113.71 | 100.00% | 114.46 | 114.46 | 100.00% |
| d) | Personal Loan | 1,392.19 | 391.85 | 28.15% | 1,540.14 | 645.62 | 41.92% |
| e) | **Sub-total (ii)** | **4,234.80** | **3,234.46** | 76.38% | **5,267.20** | **4,372.69** | 83.02% |
| | **Total (i+ii)** | **27,054.38** | **25,422.93** | **93.97%** | **28,190.29** | **26,631.21** | **94.47%** |

**5. Details of accounts subjected to restructuring**

(Amount Rs.in Lakh)

| | | Agriculture and allied activities | | Corporates (excluding MSME) | | Mirco, Small and Medium Enterprises (MSME) | | Retail (excluding agriculture and MSME) | | Total | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Current Year | Previous Year | Current Year | Previous Year | Current Year | Previous Year | Current Year | Previous Year | Current Year | Previous Year |
| Standard | Number of Borrowers | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | Gross Amount | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | Provision held | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| Sub-standard | Number of Borrowers | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |

**6. Fraud Accounts**

(Amount in Rs.in Lakh)

| | Current Year | Previous Year |
|---|---|---|
| Number of fraud reported | 0 | 0 |
| Amount involved in fraud | 0 | 0 |
| Amount of provision made for such frauds | 0 | 0 |
| Amount of Un-amortized provision debited from 'Other reserves' as at the end of the year | 0 | 0 |

**7. Exposure to Real Estate Sector**

(Amount in Rs.in Lakh)

| Category | Current Year | Previous Year |
|---|---|---|
| i) Direct exposure | | |
| a) Residential Mortgages - | 0.00 | 0.00 |
| Lending fully secured by mortgages on residential property that is or will be occupied by the borrower or that is rented. Individual housing loans eligible for inclusion in priority sector advances shall be shown separately. Exposure would also include non-fund based (NFB) limits | 0.00 | 0.00 |
| b) Commercial Real Estate- | | |
| Lending secured by mortgages on commercial real estate (office buildings, retail space, multipurpose commercial premises, multi family residential buildings, multi tenanted commercial premises, industrial or warehouse space, hotels land acquisition, development and construction, etc). Exposure would also include non-fund based (NFB) limits. | 0.00 | 0.00 |
| c) Investments in Mortgage-Backed Securities (MBS) and other securitized exposures- | | |
| i) Residential | 0.00 | 0.00 |
| ii) Commercial Real Estate | 0.00 | 0.00 |
| iii) Indirect Exposure | 0.00 | 0.00 |
| Fund based and non-fund based exposures on National Housing Bank and Housing Finance Companies | 0.00 | 0.00 |
| Total Exposure to Real Estate Sector | 0.00 | 0.00 |

**8. Exposure to capital market**

(Amount in Rs.in Lakh)

| | Particulars | Current Year | Previous Year |
|---|---|---|---|
| i) | Direct investment in equity shares, convertible bonds, convertible debentures and units of equity oriented mutual funds the corpus of which is not exclusively invested in corporate debt; | 0.00 | 0.00 |
| ii) | Advances against shares / bonds / debentures or other securities or on clean basis to individual for investment in shares (including IPSs / ESOPs), convertible bonds, convertible debentures, and units of equity oriented mutual funds; | 0.00 | 0.00 |
| iii) | Advances for any other purposes where shares or convertible bonds or convertible debentures or units of equity oriented mutual funds are taken as primary security; | 0.00 | 0.00 |
| iv) | Advances for any other purposes to the extent secured by the collateral security of shares or convertible bonds or convertible debentures or unit of equity oriented mutual funds i.e. where the primary security other than shares / convertible bonds / convertible debentures / units of equity oriented mutual funds does not fully cover the advances; | 0.00 | 0.00 |
| v) | Secured and unsecured advances to stockbrokers and guarantees issued on behalf of stockbrokers and market makers; | 0.00 | 0.00 |
| vi) | Loans sanctioned to corporates against the security of shares / bonds / debentures or other securities or on clean basis for meeting promoter's contribution to the equity of new companies in anticipation of raising resources; | 0.00 | |
| vii) | Bridge loans to companies against expected equity flows / issues; | 0.00 | 0.00 |
| viii) | Underwriting commitments taken up by the banks in respect of primary issue of shares or convertible bonds or convertible debentures or units of equity oriented mutual funds; | 0.00 | 0.00 |
| ix) | Financing to stockbrokers for margin trading; | 0.00 | 0.00 |
| x) | All exposures to Venture Capital Funds (both registered and unregistered) | 0.00 | 0.00 |
| | Total exposure to capital market | 0.00 | 0.00 |

**9. Unsecured Advances**

(Amount in Rs.in Lakh)

| Particulars | Current Year | Previous Year |
|---|---|---|
| Total unsecured advances of the bank | 3529.65 | 4707.87 |
| Out of the above, amount of advances for which intangible securities such as charge over the rights, licenses, authority, etc. have been taken | Nil | Nil |
| Estimated value of such intangible securities | Nil | Nil |

**10. Factoring Exposures**

(Amount in Rs.in Lakh)

| Particulars | Current Year | Previous Year |
|---|---|---|
| Nil | Nil | Nil |

**11. Exposure of RCBs** — Annex III

**Central Co-operative Banks**

(Amount Rs.in Lakh)

| Sl. No. | Exposure to | Current Year 2024-25 | | | Previous Year 2023-24 | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Gross Exposure | Advances | Out of which gross non-performing advances | Gross Exposure | Advances | Out of which gross non-performing advances |
| 1 | Primary Agricultural Credit Societies (PACs) – on lending | 312 | 21896.11 | 21896.11 | 312 | 21911.49 | 21911.49 |
| 2 | PAC s- other exposure | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 3 | Other credit societies | 4 | 97.22 | 97.22 | 4 | 97.22 | 97.22 |
| 4 | Other non-credit co-operative societies | 55 | 3864.70 | 3864.70 | 55 | 3864.70 | 3864.70 |
| 5 | Companies | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 6 | Public Sector Undertakings | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |

**12. Concentration of deposits, advances, exposures and NPAs**

**a) Concentration of deposits**

(Amount in Rs.in Lakh)

| Particulars | Current Year | Previous Year |
|---|---|---|
| Total deposits of the twenty largest depositors | 12057.60 | 11663.13 |
| Percentage of deposits of twenty largest depositors to total deposits of the bank | 35.62% | 34.44% |

**b) Concentration of advances***

(Amount in Rs.in Lakh)

| Particulars | Current Year | Previous Year |
|---|---|---|
| Total advances to the twenty largest borrowers | 2903.48 | 3788.33 |
| Percentage of advances to twenty largest borrowers to total advances of the bank | 10.73% | 13.44% |

**c) Concentration of exposures****

(Amount in Rs.in Lakh)

| Particulars | Current Year | Previous Year |
|---|---|---|
| Total exposure to the twenty largest borrowers/customers | 2903.48 | 3788.33 |
| Percentage of exposures to the twenty largest borrowers/customers to the total exposure of the bank on borrowers/customers | 10.73% | 13.44% |

**d) Concentration of NPAs**

(Amount in Rs.in Lakh)

| Particulars | Current Year | Previous Year |
|---|---|---|
| Total Exposure to the top twenty NPA accounts | 2903.48 | 3788.33 |
| Percentage of exposures to the twenty largest NPA exposures to total Gross NPAs. | 11.42% | 14.23% |

**13. Disclosure of Complaints**

**a) Summary information on complaints received by the bank from customers and from the Offices of Ombudsman**

| Sr. No | | Particulars | Previous Year | Current Year |
|---|---|---|---|---|
| | | Complaints received by the bank from its customers | | |
| 1 | | Number of complaints pending at beginning of the year | 0 | 0 |
| 2 | | Number of complaints received during the year | 231 | 197 |
| 3 | | Number of complaints disposed during the year | 231 | 197 |
| | 3.1 | Of which, number of complaints rejected by the bank | 0 | 0 |
| 4 | | Number of complaints pending at the end of the year | 0 | 0 |
| | | Maintainable complaints received by the bank from Office of Ombudsman | 0 | 0 |
| 5 | | Number of maintainable complaints received by the bank from Office of Ombudsman | | |
| | 5.1 | Of 5, number of complaints resolved in favour of the bank by Office of Ombudsman | 0 | 0 |
| | 5.2 | Of 5, number of complaints resolved through conciliation/mediation/advisories issued by Office of Ombudsman | 0 | 0 |
| | 5.3 | Of 5, number of complaints resolved after passing of Awards by Office of Ombudsman against the bank | 0 | 0 |
| 6 | | Number of Awards unimplemented within the stipulated time (other than those appealed) | 0 | 0 |

**Note:** Maintainable complaints refer to complaints on the grounds specifically mentioned in Integrated Ombudsman Scheme, 2021 (Previously Banking Ombudsman Scheme, 2006) and covered within the ambit of the Scheme.

**13. Disclosure of Complaints**

**b) Top five grounds of complaints received by the bank from customers**

| Grounds of complaints, (i.e. complaints relating to) | Number of complaints pending at the beginning of the year | Number of complaints received during the year | % increase/ decrease in the number of complaints received over the previous year | Number of complaints pending at the end of the year | Of 5, number of complaints pending beyond 30 days |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| **Current year** | | | | | |
| Ground - 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| Ground - 2 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| Ground - 3 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| Ground - 4 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| Ground - 5 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| Others | 0 | 197 | -14.72 | 0 | 0 |
| **Total** | **0** | **197** | **-14.72** | **0** | **0** |
| **Previous Year** | | | | | |
| Ground - 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| Ground - 2 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| Ground - 3 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| Ground - 4 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| Ground - 5 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| Others | 0 | 231 | -31.25 | 0 | 0 |
| **Total** | **0** | **231** | **-31.25** | **0** | **0** |

**14. Provisions and contingencies**

(Amount in Rs in Lakh)

| Provision debited to Profit and Loss Accounts | Current Year | Previous Year |
|---|---|---|
| i) Provision for NPI | 0.00 | 0.09 |
| ii) Provision towards NPA | 25393.22 | 26625.50 |
| iii) Provision made towards Income Tax | 0.00 | 0.00 |
| iv) Other Provisions and Contingencies (with details) | 4227.28 | 7140.33 |
| a) Provision for Standard Asset | 6.47 | 5.61 |
| b) Provision for Amt receivable from MSC Bank under Baidhyanathan | 3.59 | 3.59 |
| c) Deposit with Mah.Rajya Sahakari Sangha | 0.01 | 0.01 |
| d) Advance to Others | 1.80 | 1.80 |
| e) Advance to Group Secretary of PACS | 95.65 | 97.99 |
| f) Dispute Forum (Court Case) | 40.36 | 40.36 |
| g) Provision for SBN Notes | 78.61 | 78.61 |
| h) Provision for Overdue Interest | 4000.79 | 6912.36 |

## INDEPENDENT AUDITOR'S REPORT

**To,**
**The Members,**
**The Wardha District Central Co-operative Bank Ltd.,Wardha.**

**Report on the Financial Statements as a Statutory Auditor**

We have audited the accompanying financial statements of **The Wardha District Central Co-operative Bank Ltd., Wardha.** as at 31 March 2025, which comprise the Balance Sheet as at 31 March 2025, and the Profit and Loss Account, and a summary of significant accounting policies and other explanatory information. The returns of Head Office and eight branches audited by us are incorporated in these financial statements.

**Management's Responsibility for the Financial Statements**

Management is responsible for the preparation of the financial statements that give a true and fair view of the financial position, financial performance and cash flow of the Bank in accordance with the Banking Regulation Act 1949 (as applicable to co-operative societies), the guidelines issued by the Reserve Bank of India and the guidelines issued by the National Bank for Agricultural and Rural Development, the Registrar of Cooperative Societies, Maharashtra, the Maharashtra Co-operative Societies Act, 1960, and the Maharashtra Co-operative Societies Rules, 1961, (as applicable) and generally accepted accounting principles in India so far as applicable to the Bank. This responsibility includes design, implementation and maintenance of internal control relevant to the preparation of the financial statements that are free from material misstaternent, whether due to fraud or error.

**Auditor's Responsibility**

Our responsibility is to express an opinion on the financial statements based on our audit. We conducted our audit in accordance with Standards on Auditing issued by the Institute of Chartered Accountants of India. Those Standards require that we comply with ethical requirements and plan and perform the audit to obtain reasonable assurance about whether the financial statements are free from material misstatements.

An audit involves performing procedures to obtain audit evidence about the amounts and disclosures in the financial statements. The procedures selected depend on the auditor's judgment, including the assessment of the risks of material misstatement of the financial statements, whether due to fraud or error. In making those risk assessments, the auditor considers internal control relevant to the Bank's preparation and fair presentation of the financial statements in order to design audit procedures that are appropriate in the circumstances, but not for the purpose of expressing an opinion on effectiveness of the Bank's internal control. An audit also includes evaluating the appropriateness of accounting policies used and the reasonableness of the accounting estimates made by management, as well as evaluating the overall presentation of the financial statements.

We believe that the audit evidence we have obtained is sufficient and appropriate to provide a basis for our audit opinion.

**Emphasis of Matters -**

Without qualifying our opinion, we bring to your attention the following:

1. The bank has, represented that all documentation in respect of the advances outstanding are being maintained properly and no further impact is expected on the financial performance of the bank for the year ended March 31, 2025 other than those included in the trial balance of the bank.
2. The financial performance of the bank has been thus prepared and presented by the bank and audited by us in the aforesaid conditions.

**Opinion**

Subject to qualification reported in notes annexed to this report of even date, in our opinion and to the best of our information and according to the explanations given to us, the aforesaid financial statements together with the Notes thereon give the information required by the Banking Regulation Act, 1949 (as applicable to Co-operative societies), the Maharashtra Cooperative Societies Act, 1960, the Maharashtra Cooperative Societies Rules, 1961 and the guidelines issued by the National Bank for Agricultural and Rural Development (as applicable) and guidelines issued by Reserve Bank of India and Registrar of Cooperative societies, Maharashtra in the manner so required and give a true and fair view in conformity with the accounting principles generally accepted in India:

In the case of the Balance Sheet, of state of affairs of the Bank as at 31st March 2025;

In the case of the Profit and Loss Account, of the profit/loss for the year ended on that date; and

**Report on Other Legal & Regulatory Requirements**

The Balance Sheet and the Profit and Loss Account have been drawn up in Forms "A" and "B" respectively of the Third Schedule to the Banking Regulation Act, 1949 and provisions of the Maharashtra Co-operative Societies Act, 1960 and the Maharashtra Co-operative Societies Rules 1961.

We report that:

a) We have obtained all the information and explanations, which to the best of our knowledge and belief were necessary for the purpose of our audit and have found to be satisfactory;

b) In our opinion, proper books of accounts required by law have been kept by the Banks so far as it appears from our examination of those books and proper returns, adequate for the purposes of our audit have been received from the branches/offices;

c) The transactions of the Bank which have come to our notice are within the powers of the Bank;

d) The Balance Sheet and the Profit and Loss Account dealt with by this report, are in agreement with the books of account and the returns;

e) The accounting standards adopted by the Bank are consistent with those laid down by accounting principles generally accepted in India so far as applicable to Banks.

The details as required by the Rule 69(6) of Maharashtra Co-operative Societies Rules1961 are given in the audit memorandum separately.

As per the information and explanations given to us and based on our examination of the books of account and other records, we have not come across material instances in respect of the details mentioned in the Rule 69(6) of Maharashtra Co-operative Societies Rules1961.

We further report that for the year under audit, The Bank has been awarded "C" Classification.

For Anil Mardikar & Co.
Chartered Accountants
FRN 100454W

ANIL MARDIKAR & CO. NAGPUR CHARTERED ACCOUNTANTS

(Anil Mardikar)
Partner
Mem. No. 032778
UDIN: 25032778BMOOIO3365
Date: 05-06-2025

# भक्तिमार्ग



आयुष्यात येणारे प्रसंग आपल्याला बरंच काही शिकवून जातात. प्रसंग आपल्या आयुष्यात घडलेले असोत वा इतरांच्या, त्यातून काही ना काही बोध घ्यावाच लागतो. एका आप्ताच्या चटका लावणाऱ्या मृत्यूनंतर त्याच्या कुटुंबियांनी दाखवलेल्या धीरोदात्त वृत्तीतून हेच शिकता आलं. ओळखीतल्या एका बाईंचा तरूण मुलगा अपघातात गेला. त्या घरावर मोठी आपत्ती कोसळली. दुःख तर होतंच पण घरातलं वातावरण सामान्य असावं असा प्रत्येकाचाच प्रयत्न होता. मुलाच्या आईने या प्रसंगात धीराचं दर्शन घडवलं. सत्तरीच्या या बाई हस्तकलेच्या वस्तू तयार करतात. अशा प्रसंगात कुणीही खचून जाईल. पण त्या खचल्या नाहीत. मुलाच्या आठवणी होत्या. पण या आठवणी मनात ठेऊन त्यांनी हस्तकलेच्या वस्तू घडवल्या. गुलाबाची सुंदर फुलं तयार केली. प्लॅस्टीकच्या पिशव्यांपासून छोटी फुलं बनवली. तेराव्या दिवसाच्या विधीनिमित्ताने आलेल्या अनेकांना या वस्तू दाखवल्या. या विधीसाठी जमलेल्या नातेवाईकांनी मुलाच्या आठवणी सांगितल्या. पण घरचं वातावरण अगदी सामान्य होतं. घरी आलेल्या प्रत्येक पाहुण्याची काळजी घेतली गेली. कुणाला काही कमी पडू नये याकडे त्यांनी जातीने लक्ष दिलं. दुःखाचं कोणतंही प्रदर्शन मांडलं नव्हतं. घरात वेगळ्या

भक्ती मार्ग

विषयांच्या गप्पा झाला. अपघातात मृत्यू पावलेला मुलगा खूपच लाघवी. माणसं जोडून ठेवणारा. प्रत्येकाच्या मदतीस हजर असणारा. पाककौशल्यं अंगी असणारा. प्रत्येकाला चांगलंचुंगलं खाऊ घालणारा. त्यामुळे त्याच्या मनाला समाधान वाटेल, असंच वातावरण ठेवण्याचा त्यांचा प्रयत्न दिसून आला. आत्म्याला मिळणारी शांती म्हणजे तरी दुसरं काय? आपण जे सोडून गेलोय त्याचं अनुकरण इतरांनी करणं, मृताच्या गुणांचं आचरण करणं आणि त्याप्रमाणे जगण्याचा प्रयत्न करणं हीच खरी शांती नाही का?

## मनाचं समाधान...



रामायण-महाभारतकालीन घटनांची साक्ष देणारी अनेक स्थानं आपल्या देशात आहेत. त्यापैकी एक म्हणजे चित्रकूट. श्रीरामचंद्राने वनवासातला सुरूवातीचा काही काळ या स्थानी घालवला होता. मध्य प्रदेशमधल्या सतना जिल्ह्यातल्या मंदाकिनी नदीच्या किनारी हे स्थान

## चित्रकूटविषयी...



याच स्थानी राम आणि भरताची भेट झाली. भरताने रामाच्या पादुका याच स्थानी घेतल्या. चित्रकूट हे अत्यंत निसर्गरम्य स्थान. त्यामुळेच वाल्मिकी ऋषींनी रामाला या ठिकाणी राहण्याचा सल्ला दिला होता. या ठिकाणचा धबधबा ९५ फूट उंचावरून कोसळत असल्याने त्याला अमेरिकेतल्या नायगारा धबधब्याची उपमा देण्यात आली आहे. चित्रकूट परिसरातल्या अनेक ठिकाणी श्रीरामाच्या पाऊलांचे ठसे आजही अस्तित्त्वात आहेत. स्फटिक शिळेवर रामाची पावलं उमटली आहेत. याच ठिकाणी राम आणि भरत यांची भेट झाली. श्रीरामाची पावलं या स्थानी उमटली. चित्रकूटपासून पाच किलोमीटर

लक्षवेधी तीर्थक्षेत्रे

अंतरावर भरत कूप नावाची विहिर आहे. भरताने रामाच्या राज्याभिषेकासाठी इथून पाणी नेल्याचं बोललं जातं. या ठिकाणी भरताचंही मंदिर आहे. त्याच्याच पुढे असलेल्या रामशय्या नावाच्या ठिकाणी राम-सीतेने एकत्र विश्रांती घेतली होती, असं मानतात. इथल्या चरण पादुका ठिकाणाजवळ एक टेकडी आहे. याला लक्ष्मण टेकडी असं म्हटलं जातं. ही लक्ष्मणाची सर्वात आवडती जागा होती. इथे बसून लक्ष्मण पहारा देत असे. इथल्या संकर्षण पर्वतावर हनुमानाचं मंदिर असून सीतेचं स्वयंपाकघरही आहे. या स्थानाच्या आसपास अनेक पवित्र स्थानं आहे. म्हणूनच चित्रकुटाचा महिमा मोठा आहे.





महाभारतातल्या उद्योगपर्वात चार गुणांचा उल्लेख करण्यात आला आहे. या गुणांचं पालन करणाऱ्या व्यक्तीवर परमेश्वर प्रसन्न होतो आणि त्याची कृपादृष्टी राहते असं म्हटलं जातं. कोणते आहेत हे गुण?

## गुण मनुष्याचे...



सत्य आणि धर्म हे अत्यंत महत्त्वाचे गुण मानले जातात. धर्माने वागणारा आणि सत्यवादी धर्मराजा म्हणजे युधिष्ठिर श्रीकृष्णाला अत्यंत प्रिय होता. आयुष्यातल्या प्रत्येक प्रसंगात युधिष्ठिराने धर्माचं पालन केलं. दुःख भोगावं लागलं तरी त्याने धर्माची साथ कधीही सोडली नाही. त्यामुळे श्रीकृष्ण कायम त्याच्या सोबत राहिला. कायम सत्य बोलणाऱ्या आणि धर्माचं पालन करणाऱ्या व्यक्तीच्या पाठीशी परमेश्वर ठामपणे उभा राहतो हे लक्षात ठेवावं.

धर्मग्रंथातून

* लज्जा हा तिसरा गुणधर्म. श्रीकृष्णाने १६,००० स्त्रियांशी विवाह केला होता. नरकासूर राक्षसाने या १६,००० राजकन्यांचं अपहरण केलं होतं. श्रीकृष्णाने त्यांची सुटका केली. सुटकेनंतर या राजकन्यांच्या चेहऱ्यावर जाणवणारी लज्जा आणि आपल्याप्रती असलेली समर्पण वृत्ती जाणून श्रीकृष्णाने त्यांच्याशी विवाह केला होता. परमेश्वराप्रती समर्पित वृत्ती आणि लज्जेचा भाव असणाऱ्या भक्तावर भगवंत प्रसन्न होतो.

* साधेपणा हा चौथा गुण. सुदामा हा श्रीकृष्णाचा प्रिय मित्र. सुदामाचा साधेपणा कृष्णाला भावायचा. निर्मळ मनाचा, सा... जपणारा मनुष्य परमेश्वराला भावतो.



देवघर कसं असावं, कोणत्या दिशेला असावं, देवघरातल्या मूर्तीचा आकार कसा असावा याबाबत अनेक समज-गैरसमज आहेत. फारशी माहिती नसल्याने चुकीच्या मूर्ती देवघरात ठेऊन आपण नकारात्मक ऊर्जेला आकर्षित करतो. देवाच्या उभ्या मूर्ती देवघरात असू नयेत. याबाबतच्या कारणांविषयी..

## कशा असाव्यात देवघरातल्या मूर्ती?



देवघरात स्थापन केलेल्या देवाच्या मूर्तीमुळे घरात सकारात्मक आणि नकारात्मक ऊर्जा प्रवेश करते.

* हिंदूधर्मीयांचे ३३ कोटी देव आहेत. प्रत्येक देवाची रूपे वेगळी, अवतार वेगळे. प्रत्येक देवाच्या मूर्ती विविध पद्धतीने घडवल्या जातात. काही मूर्ती उभ्या असतात तर काही बसलेल्या. काहींना चार भुजा असतात तर काही अष्टभुजा आणि दशभुजाही असतात. काही मूर्ती आडव्या झोपलेल्या असतात.

जाणून घ्या

* ठराविक स्थितीतल्या मूर्ती घरात ठेवल्याने आपल्या तसंच कुटुंबातल्या सदस्यांच्या आयुष्यात अडचणी येण्याची शक्यता असते.

* शास्त्रानुसार गणपती आणि देवी लक्ष्मीच्या उभ्या मूर्ती घरात असू नयेत. या देवतांच्या उभ्या मूर्तीमुळे घरात नकारात्मक ऊर्जा प्रवेश करते, असं मानलं जातं.

* हिंदूंच्या धार्मिक ग्रंथांनुसार या दोन्ही मूर्ती बसलेल्या स्थितीत असाव्यात. या दोन मूर्तीमध्ये १० इंचांपेक्षा जास्त अंतर नसावं.

* देवघरात बाळकृष्ण ठेवावा. कृष्णाची बासरी वाजवणारी उभी मूर्ती देवघरात ठेऊ नये.

* मृत व्यक्तींच्या तसबिरी देवघरात ठेऊ नयेत.

* देवघराला कधीही कुलूप लावू नये.

* देवघर नेहमी स्वच्छ ठेवावं.



आयुष्यात चढ-उतार येत राहतात. अडचणीच्या काळात खचून जाता कामा नये. धीर एकवटून प्रत्येक गोष्टीचा सामना करायला हवा. आयुष्यात धैर्याला प्रचंड महत्त्व आहे. आयुष्यातल्या कोणत्या प्रसंगांचा सामना धीराने करायला हवा?

## नका सोडू धैर्य!

प्रत्येक व्यक्तीसाठी आपला मान-सन्मान महत्वाचा असतो. आयुष्यात अपमानीत होण्याचे काही प्रसंग येतात. ज्येष्ठ व्यक्तीचं बोलणं माणूस सहन करतो पण लहानांनी केलेला अपमान सहन होत नाही. रागाच्या भरात माणूस चुकीचं पाऊल उचलतो. मात्र अशा प्रसंगी धैर्य आणि मानसिक संतुलन ढळू देता कामा नये. प्रसंग नीट हाताळता आलं पाहिजे. समोरचा रागात असताना आपण शांत राहणं गरजेचं आहे.

आर्ट ऑफ लिव्हींग

* सहचरासोबत आपलं अनोखं नातं असतं. विश्वासाने हे नातं बळकट होत असतं. पण अविश्वासाचे प्रसंगही येतात. अशा परिस्थितीत धीर सोडता कामा नये. आपलं नातं टिकवून ठेवण्यासाठी प्रसंगी नमतं घ्यावं लागलं तरी हरकत नाही. स्त्री-पुरूष दोघांनाही हे तत्वं लागू पडतं.

* अपयशामुळे माणूस खचतो. वारंवार अपयश येत असेल तर स्वतःवरचा विश्वास उडतो. पण आत्मविश्वास ढळू न देता प्रयत्न करत राहायला हवेत. एक दिवस यश नक्की मिळेल, असा विश्वास मनात असला पाहिजे.



## देव कुठे आहे?

अकबर आणि बिरबलाच्या अनेक कथा प्रचलित आहेत. त्यापैकी एक ईश्वराच्या अस्तित्त्वाविषयी आहे. या कथेतून आपल्याला बराच बोध घेता येईल. देव कुठे राहतो, त्याला कसं प्राप्त करायचं, देव काय करतो असे तीन प्रश्न अकबराने बिरबलाला विचारले. बिरबल या प्रश्नांची उत्तरं शोधण्यात गढून गेला. बिरबल चिंतेत असल्याचं दिसताच त्याच्या मुलाने याचं कारण विचारलं. बिरबलाने त्याला प्रश्नांबाबत सांगितलं. दरबारात आपण या प्रश्नांची उत्तरं देऊ, असं बिरबलाच्या मुलाने त्याला सांगितलं. पहिल्या प्रश्नाच्या उत्तरादाखल मुलाने एक उदाहरण दिलं. दुधात साखर घालून अकबराला ते चाखायला सांगितलं. दुध गोड लागत असल्याचं अकबराने सांगितल्यावर त्यात साखर दिसते का, असा प्रश्न मुलाने विचारला. साखर दुधात विरघळून गेल्याचं अकबराने सांगताच बिरबलाच्या मुलाने ईश्वरही असाच चराचरात विरघळून गेल्याचं सांगितलं. देवाला कसं प्राप्त करायचं या प्रश्नाच्या उत्तरादाखल बिरबलाच्या मुलाने दही आणायला सांगितलं. दह्यात लोणी आहे का, असा प्रश्न त्याने विचारला. यावर दह्यात लोणी आहे पण घुसळल्यानंतरच ते दिसेल, असं उत्तर दिलं. त्याचप्रमाणे ईश्वरही चिंतनानंतरच प्राप्त होतो, असं उत्तर मुलाने दिलं. देव काय करतो, या प्रश्नाच्या उत्तरादाखल मुलाने अकबराला आपला शिष्य बनायला सांगितलं. गुरू उच्च आसनावर बसतो आणि शिष्य खाली बसतो असं सांगितल्यावर अकबर खाली बसला आणि मुलाला आसनावर बसायला दिलं. देव राजाला रंक आणि रंकाचा राजा करतो असं सांगितल्यावर अकबर खूश झाला. देवाच्या अस्तित्त्वाबद्दल अकबराच्या मुलाने दिलेली उत्तरं आजच्या काळातही तितकीच समर्पक आहेत.

भक्तीगाथा



घरातल्या वास्तूदोषांमुळे दैनंदिन जीवनात अनेक अडचणी येतात. आर्थिक अडचणींचा संबंध घरातल्या वास्तूरचनेशी असू शकतो. आर्थिक अडचणींशी संबंधित वास्तूदोषांबाबत जाणून घेऊ या...

* वास्तूशास्त्रानुसार उत्तर-पूर्व दिशेने धनाचं आगमन होतं. या दिशेला अवजड सामान किंवा अस्वच्छता असेल तर आर्थिक अडचणी येतात. अशा घरांमध्ये आर्थिक भरभराट धीम्या गतीने होते.

* उत्तर-पश्चिम दिशा बंदिस्त असणं वास्तूशास्त्रानुसार अशुभ मानलं जातं. या दिशेला अंधःकार असेल तर घरात वादविवाद होतात आणि आर्थिक अडचणी येतात.

वास्तू भक्ती

* घराचा दरवाजा दक्षिणेकडे असणं अशुभ मानलं जातं. त्यामुळे कपाट किंवा घराचा दरवाजा या दिशेला असू नये.

* घराचं स्वयंपाकघर उत्तर-पूर्व दिशेला असेल तर आर्थिक ताळमेळ बसत नाही. स्वयंपाकघर पश्चिम किंवा दक्षिण-पूर्व दिशेला असणं शुभ मानलं जातं.

* घरच्या कर्त्या पुरूषाची झोपण्याची खोली दक्षिण-पूर्व दिशेला असू नये. यामुळे घरात अडचणी येतात तसंच कर्त्या पुरूषाच्या आयुष्यात सतत ताणतणाव येत राहतात. कौटुंबिक सुख मिळत नाही.

* दक्षिण-पश्चिमेकडे दरवाजे असलेल्या खोल्या घरातल्या इतर खोल्यांपेक्षा मोठ्या असतील तर आर्थिक अडचणी येतात. कायदेविषयक अडचणींचा सामना करावा लागतो. आरोग्यविषय समस्या उद्भवतात.




## आर्थिक अडचणी आहेत?



गणपती ही देवता विविध देश आणि संस्कृतींमध्ये वेगवेगळ्या रूपांमध्ये पूजली जाते हे आपण जाणतो. त्याचप्रमाणे भगवान शंकराची चीनमध्ये पूजा केली जात असे. चीनमध्ये आज बौद्धधर्मीयांचं प्रमाण सर्वाधिक असलं तरी प्राचीन काळात इथे शंकराची पूजा केली जात असे. याबाबतचा उल्लेख महाभारतात आढळतो. आपल्या अर्थशास्त्र या ग्रंथात चाणक्याने चिनी संस्कृतीचा उल्लेख के लाय. इसवी सन पूर्व २२१ मध्ये शिन हुआंग टी नावाच्या व्यक्तीने चिनी साम्राज्याची स्थापना केली होती, असा उल्लेख अर्थशास्त्र ग्रंथात आढळतो. चीनमधल्या क्वानजाउ प्रांतातल्या शिनमेन भागातल्या फुजियान प्रांतात प्राचीन शिवमंदिराचे अवशेष आढळतात.

## चीनमधला शंकर

धर्म देशोदेशीचे

आजसुद्धा येथे पाच फुटांचं शिवलिंग पहायला मिळतं. शंकराच्या मंदिराचे आता भग्नावशेष शिल्लक आहेत. पण इथल्या भिंतींवर वेदिक धर्मविषयक नकाशे आढळतात.

इसवीसन पूर्व १०११ मध्ये हे मंदिर तोडण्यात आलं होतं. पण इसवीसन १४०० मध्ये याची पुनर्स्थापना करण्यात आली. १९५० पर्यंत पुत्रप्राप्तीसाठी चिनी महिला या मंदिरात येऊन शंकराची आराधना करत असत. सहाव्या शतकाच्या सुरूवातीपर्यंत येथे हिंदू मंदिरांचं अस्तित्त्व असल्याचे पुरावे सापडले आहेत. चीनमधल्या सुवांग वू प्रांतात सापडलेल्या खांबावर संस्कृत भाषेतले लेख आढळतात. हिंदू धर्मात मृत्यूची देवता मानल्या गेलेल्या यमाला चीनमध्ये यनमो वांग असं म्हटलं जातं. यामुळे हिंदू आणि चिनी संस्कृतीत बरंच साम्य दिसतं.





# संविधान हत्या दिवस' हास्यास्पद

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २५ :
देश स्वतंत्र होत असताना ज्यांनी स्वातंत्र्याला विरोध केला. इंग्रजांच्या विचारधारेच्या विरोधात सर्व देश उभा असताना ज्यांची विचारधारा इंग्रजांसोबत उभी होती. ज्यांनी ५५ वर्षांपर्यंत तिरंगा फडकवला नाही. अशा लोकांनी लोकशाहीचे हत्या केली किंवा संविधानाची हत्या केली असे बोलणे, चुकीचा आहे. हे सर्व हास्यास्पद असल्याचे काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी म्हटले आहे.

या माध्यमातून वडेट्टीवार यांनी भाजपच्या वतीने पाळण्यात येत असलेल्या 'संविधान हत्या दिवस' याला विरोध केला आहे. सध्या रोजच संविधानाची हत्या होत असल्याचा आरोपही वडेट्टीवार यांनी केला आहे. सध्या देशात अघोषित आणीबाणी असल्याचा दावा देखील त्यांनी केला.

भाजप याला 'संविधान हत्या दिवस' म्हणत आहेत हे हास्यास्पद आहे. कारण ते दररोज संविधान बदलण्याबद्दल बोलतात. त्यांचे उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री मनुस्मृती त्यांच्या टेबलावर ठेवून त्यांचा संविधानावर विश्वास नसल्याचे सांगतात.

भाजमधील बरेच जण संविधान बदलण्याबद्दल आणि मनुस्मृती लागू करण्याबद्दल बोलत असतात. जे दररोज संविधानाची हत्या करत आहेत, त्यांना त्याबद्दल बोलण्याचा अधिकार नसल्याचे वडेट्टीवार यांनी म्हटले आहे.

भाजप जेव्हा आणीबाणी विषय बोलतो, त्यावेळी इंदिरा गांधी यांनी आणीबाणी नंतर स्वतः निवडणूक लढवली होती. त्यानंतर देखील जनतेने इंदिरा गांधी यांना प्रचंड बहुमत दिले होते. म्हणजेच आणीबाणी लागू करणे ही त्यावेळची गरज होती, असा दावा देखील विजय वडेट्टीवार यांनी केला आहे.

### वडेट्टीवार यांनी भाजपला सुनावले : अघोषित आणीबाणीचा आरोप



### देशात रोज संविधानाची हत्या

सध्या आपल्या देशात रोजची आणीबाणी झाली आहे. ही अघोषित आणीबाणी असल्याचा आरोप विजय वडेट्टीवार यांनी केला आहे. आज संविधानावर कोण चालतंय? आज तर मन मजीर्ने काम चालू आहे? आज पन्नास वषार्नंतर ते आज संविधान हत्या दिवस असल्याचे म्हणत आहे. जे रोज संविधानाची हत्या करतात, त्यांना हे बोलण्याचा अधिकार नाही. त्यांनी असे बोलणे म्हणजे हास्यास्पद असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

## इंदिरा गांधींच्या आणीबाणीचे राऊतांकडून समर्थन

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २५ :
आणीबाणीला ५० वर्ष झाल्याच्या निमित्ताने भाजपतर्फे 'संविधान हत्या दिवस' पाळण्यात येत आहे. याला खासदार संजय राऊत यांनी विरोध दर्शवला आहे. इंदिरा गांधी यांनी लादलेल्या आणीबाणीचे समर्थन देखील केले आहे. गेल्या दहा वर्षांपासून देशात अघोषित आणीबाणी लागू असल्याचा आरोप त्यांनी केला.



आपात्काळ किंवा आणीबाणी हा संविधान हत्या दिवस कसा होऊ शकतो? असा प्रश्न राऊत यांनी उपस्थित केला. संघाचे संस्थापक बाळासाहेब देवरस यांनी आणीबाणीला पाठिंबा दिला होता. त्यांना इंदिरा गांधी यांना अटक केली होती. मात्र, तुरुंगातून त्यांनी जो पत्र व्यवहार केला होता, तो एकदा पहा, देवरस यांनी आणीबाणीला समर्थन दिल्याचा दावा राऊत यांनी केला आहे.

बाळासाहेब ठाकरे यांनी देखील जाहीर पणे आणीबाणीचे समर्थन केले होते. त्यांनी खुले समर्थन दिले होते. आणीबाणी ही शिस्त लावणारी एक व्यवस्था होती.

देशांमध्ये अशांतता, अस्थिरता निर्माण करण्याचा प्रयत्न होतो, अशा वेळी अशांतता निर्माण करण्यासाठी देशातील आणि देशाबाहेरील काही शक्ती काम करतात. तेव्हा अशा प्रकारे देशावर नियंत्रण मिळवण्यासाठी आणीबाणी लावण्याचा संविधानिक तरतूद भारतीय संविधान मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखालील घटनापीठाने दिल्याचे ते म्हणाले.

# त्यांच्या एकाही नेत्याची अजून ईडी चौकशी का झाली नाही?

### बच्चू कडूंचा परखड सवाल

■ महासागर प्रतिनिधी
अमरावती, दि. २५ :
प्रहार संघटनेचे नेते तथा माजी मंत्री बच्चू कडू यांनी सत्ताधारी भाजपवर सडकून टीका केली आहे. भाजप आणीबाणीपेक्षा वाईट वागली हे संपूर्ण देशाला माहिती आहे. हे लोक खरेच रामाचे भक्त असतील तर त्यांनी आजपर्यंत भाजपच्या कोणत्याही नेत्यावर ईडीची कारवाई का झाली नाही? हे सांगावे, असे त्यांनी म्हटले आहे.



संसद व विधिमंडळाची अंदाज समिती ही प्रामुख्याने सरकारला काटकसरीचा सल्ला देते. पण याच समितीच्या अध्यक्ष व सदस्यांच्या २ दिवसांच्या जेवणावर चांदीच्या थाळीचा वापर करून लाखोंचा खर्च करण्यात आल्याची बाब समोर आली आहे. या उधळपट्टीमुळे राज्य विधिमंडळाच्या कारभाऱ्यांवर टीका केली जात असताना बच्चू कडू यांनी भाजपवर उपरोक्त शब्दांत निशाणा साधला आहे.

बच्चू कडू म्हणाले, सद्यस्थितीत सरकारमध्ये अत्यंत भावनाशून्य लोक बसलेत. त्यांना कोणत्याही प्रकारच्या संवेदना नाहीत. आज राज्यात दररोज १०-१५ शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत. रोजगार हमीच्या मजुरांना वेळेवर पगार मिळत नाही.

**एकही भ्रष्टाचारी नाही का?**

एकीकडे पैसे नसल्याचे सांगायचे आणि दुसरीकडे अशी उधळपट्टी करायची. हे पाहून सर्वसामान्य माणसांना किती वेदना होत असतील याची कुणालाही कल्पना नाही. सत्तेवरचा अंकुश आता सुटलेला आहे. एखाद्या कसायाचे एकदा चारा खाऊ घालायचा आणि दररोज गाई-म्हशी कापायच्या याला काय अर्थ आहे? तुम्ही वेगळे काय करता? तुम्ही रामाचे खरे भक्त असाल तर सांगा भाजपच्या एकाही नेत्याची आजपर्यंत ईडीची चौकशी का झाली नाही? तुमच्यात एकही भ्रष्टाचारी नाही का? तुम्ही आणीबाणीपेक्षाही वाईट वागले हे संपूर्ण देशाला माहिती आहे, असे ते म्हणाले.

**जेलवारी झाली तरी**

बच्चू कडू यांनी आपल्याला कोणत्याही पदाची अभिलाषा नसल्याचेही यावेळी ठणकावून सांगितले. अनेकांना वाटत होते माज्या मनात पदाची लालसा आहे. पण ते चुकीचे आहे. आमदारकी गेली किंवा अध्यक्षपद गेले म्हणजे बच्चू कडू थांबणार असे नाही.

माझी एखादी जेलवारी झाली तरी मी थांबणार नाही. पण हुकूमशाही किती करावी याची काही मयार्दा आहे. अपात्र केले, यांची फाईल एक महिना कुठे दाना कात होती? अजूनही मला अपात्रतेची नोटीस मिळाली नाही. हा मला बदनाम करण्याचा प्रयत्न आहे.

भाजपमधील काही जण आम्हाला बदनाम करत आहेत. बँक तोट्यात असल्याची आवई उठवत आहेत. संचालकांनीही बँकेची बदनामी करू नये. मी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना फोन करेन, कॉम्प्रमाईज होईल असे अनेकांना वाटत होते. पण असे काहीही होणार नाही. कारण माझ्या आडनावातच कडू लागले आहे, असे बच्चू कडू म्हणाले.

## आ. संग्राम जगतापांची पक्षाच्या बैठकीला दांडी

### अजित पवारांनी दिला इशारा

■ वृत्तसंस्था, अहिल्यानगर, दि. २५ :
राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे आमदार संग्राम जगताप यांनी हिंदुत्ववादी भूमिका घेत अल्पसंख्यांक समुदायाला लक्ष्य केले होते. त्यांच्या या भूमिकेमुळे राजकीय वतुर्ळात चर्चा सुरू झाली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष धर्मनिरपेक्ष विचारांचा आहे. त्यात याच पक्षाच्या आमदाराने हिंदुत्ववादी भूमिका घेतल्याने उपमुख्यमंत्री अजित पवारांनी नाराजी व्यक्त केली आहे. तसेच आजच्या बैठकीत मी त्याला बोलेन, असेही त्यांनी म्हटले होते. परंतु संग्राम जगताप यांनी पक्षाच्या बैठकीला देखील दांडी मारली असल्याचे समोर आले आहे.

अजित पवारांनी संग्राम जगताप यांनी घेतलेल्या भूमिकेवर नाराजी व्यक्त करत म्हटले होते की, आजच्या बैठकीत मी संग्रामला याबाबत बोलेन. आमचा पक्ष हा धर्मनिरपेक्ष असून सर्व जाती-धर्मांना सोबत घेऊन जाणारा आहे, असे पवारांनी म्हटले. परंतु संग्राम जगताप हे बैठकीला देखील उपस्थित नव्हते.

विशेष म्हणजे अजित पवारांनी त्यांना बोलावून देखील संग्राम जगताप आले नाहीत.



त्यामुळे संग्राम जगताप यांच्या मनात नेमके आहे काय? असा प्रश्न सर्वांना पडला आहे.

अजित पवारांनी संग्राम जगताप यांच्या कृतीबाबत आज झालेल्या आमदारांच्या बैठकीत स्पष्टपणे नाराजी व्यक्त केली. एकीकडे धर्मनिरपेक्ष पक्ष म्हणून आपण पुढे जात असताना एखाद्या धमार्बाबत वादग्रस्त किंवा आक्षेपार्ह विधान पक्षातील आमदाराने करणे पक्षाला परवडणारे नाही, असे अजित पवारांनी स्पष्ट शब्दात सांगितले. तसेच अशी कृती खपवून घेतली जाणार नसल्याचा इशारा देखील अजित पवारांनी दिला आहे.

मी स्वतः संग्राम जगताप यांच्याशी बोलणार असून अशा प्रकारची वादग्रस्त विधाने का करत असल्याचा जाब विचारणार असल्याचेही त्यांनी म्हटले होते. परंतु, पक्षाच्या नियमित बैठकीला संग्राम जगताप गैरहजर राहिले.

## तोडगा निघाला नाही तर मैत्रीपूर्ण लढत

■ वृत्तसंस्था, जळगाव, दि. २५ :
महाराष्ट्रात येत्या काही महिन्यात स्थानिक स्वराज्य संस्थानच्या निवडणुका होणार आहेत. स्थानिक पातळीवरील या निवडणुकीसाठी सर्वच राजकीय पक्षांनी कंबर कसली आहे. स्थानिक पातळीपर्यंत पक्ष वाढवण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. तसेच या निवडणुका युती, आघाडी म्हणून लढवल्या जाणार आहेत की स्वबळावर लढवल्या जाणार, याबाबत देखील उत्सुकता आहे. या सगळ्यावर भाजप नेते व मंत्री गिरीश महाजन यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

गिरीश महाजन म्हणाले, जागावाटपाचा निकष अद्याप ठरलेला नाही. ज्या जागा पक्षाच्या चिन्हावर लढवल्या गेल्या, ज्या सिटिंग जागा आमच्या आहेत, त्या जागा आमच्याच आहेत, आणि हा विषय जर गुंतागुंतीचा होत असेल, तर त्यावर चर्चा करून तोडगा काढण्यात येईल. त्यावर मार्ग निघू शकतो.

मात्र आम्ही महायुतीच्या माध्यमातूनच या सर्व निवडणुका लढणार आहोत, फार काही तोडगा निघाला नाही तर मैत्री पूर्ण लढत होऊ शकते, असे त्यांनी स्पष्ट केले आहे. महायुतीमध्ये सहभागी तिन्ही पक्ष एकत्र राहून निवडणूक लढतील, असा आमचा प्रयत्न असल्याचेही महाजन यांनी स्पष्ट केले.

## दादांसह दोन शिलेदार विजयी

■ वृत्तसंस्था, पुणे, दि. २५ :
बारामती परिसरातील माळेगाव सहकारी साखर कारखान्याच्या बहुचर्चित निवडणुकीत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे नीळकंठेश्वर पॅनल बाजी मारण्याच्या तयारीत आहे.

स्वतः अजित पवारांनी ब गटातून विजय मिळवला आहे, तर २१ पैकी जवळपास १३ जागांवर त्यांच्या पॅनलचे उमेदवार पुढे आहेत. तर अजित पवार आणि रतनकुमार भोसले यांच्या विजयाची घोषणा करण्यात आली आहे. प्रतिस्पर्धी रंजन तावरे यांचा पराभव झाला आहे.

## ट्रक-ऑटोरिक्षाचा अपघात; २ ठार

■ महासागर प्रतिनिधी, अकोला, दि. २५ :
पातूर-बाळापूर रोडवरील आयटीआय कॉलेजसमोर मंगळवारी भीषण अपघातात दोन जणांचा जागीच मृत्यू झाला असून चार जण गंभीर जखमी झाले. ओव्हरटेक करताना ट्रकने मागून दिलेल्या धडकेनंतर ऑटोविरुद्ध दिशेने येणाऱ्या ट्रकवर आदळल्याने ही दुर्घटना घडली.



ऑटोरिक्षा क्रमांक एमएच ३० बीसी २०७१ हा अकोला येथून पातूर मार्गे अंबाशीकडे जात होता. देऊळगावजवळ ट्रक ओव्हरटेक करण्याच्या प्रयत्नात ऑटोला मागून धडक दिली. या धडकेमुळे ऑटोरिक्षा विरुद्ध दिशेने जाणाऱ्या दुसरा ट्रक आदळला. त्यामुळे ऑटोचा पूर्णपणे चुराडा झाला.

भीषण अपघातात पीयूष रवींद्र चतरकर (१३), रा. सिंधी कॅम्प, अकोला आणि लीलाबाई ढोरे (५०), रा. लाखनवाडा हे दोघे जागीच ठार झाले. तसेच सुरेंद्र चतरकर (४५), रवींद्र चतरकर (५२), रूपचंद वाकोडे (५०) आणि प्रमिलाबाई वाकोडे (६५) हे गंभीर जखमी झाले.

प्रवासी ऑटो व खाजगी वाहने मर्यादेपेक्षा जास्त प्रवासी घेऊन बेधडकपणे धावत असतात. नियमांचे पालन न करणाऱ्या वाहन चालकांवर कठोर कारवाईच होत नसल्याने ते नियम पाळत नाहीत. त्यामुळे या मार्गावर अपघातांची संख्या वाढत चालली आहे. वाहतूक पोलिसांनी अवैध वाहतुकीवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

## मित्रांच्या गाडीला अपघात तिघांचा जागीच मृत्यू

■ वृत्तसंस्था, संभाजीनगर, दि. २५ :
शहरातील एका धाब्यावर जेवण करून परतणाऱ्या पाच मित्रांच्या गाडीला भीषण अपघात झाला.

या अपघातात तीन जणांचा जागीच मृत्यू झाला असून, इतर दोघे गंभीर जखमी झाले आहेत. अपघाताचे कारण अद्याप स्पष्ट झाले नसले तरी, वाहनाचा वेग जास्त असल्याची प्राथमिक माहिती समोर येत आहे.

हे मित्र शहरानजिकच्या एका ढाब्यावर जेवण केल्यानंतर परत येत होते. त्याचवेळी त्यांच्या कारला अपघात होवून तिघांचाही मृत्यू झाला.

**कार चालकाच्या मारहाणीनंतर रिक्षाचालकाची आत्महत्या**

ठाणे जिल्ह्यातील डोंबिवलीच्या मोठा गाव परिसरात एका भीषण घटनेने खळबळ उडाली आहे. कार चालकाने मारहाण करून २ लाख रुपयांची नुकसान भरपाई मागितल्याने तणावाखाली आलेल्या ७० वर्षीय रिक्षाचालक मुंजाजी शेळके यांनी आज आत्महत्या केली.

मिळालेल्या माहितीनुसार, रात्री ऑटो आणि कारची धडक झाली होती. त्यानंतर कार चालक, जो ठाकरे गटाचा पदाधिकारी असल्याची प्राथमिक माहिती आहे, त्याने मुंजाजी शेळके यांना मारहाण केली आणि डांबून ठेवत २ लाख रुपयांची मागणी केली. मध्यरात्री ३ वाजता त्यांची सुटका झाल्यानंतर शेळके यांनी टोकाचे पाऊल उचलले.

या घटनेने संतप्त झालेल्या शेळके यांच्या नातेवाईकांनी विष्णू नगर पोलीस ठाण्यासमोर ठिय्या आंदोलन सुरू केले आहे. जोपर्यंत आरोपी कार चालकाविरोधात गुन्हा दाखल होत नाही, तोपर्यंत मृतदेह ताब्यात घेणार नाही, अशी भूमिका त्यांनी घेतली आहे. पोलिसांनी तपास सुरू केला आहे.

## वर्गातच घेतला शिक्षकाने गळफास

■ वृत्तसंस्था, जळगाव, दि. २५ :
एका शिक्षकाने शाळेच्या मधल्या सुट्टीत वर्गातच गळफास लावून आत्महत्या केल्याची खळबळजनक घटना जळगाव जिल्ह्यातील पाचोऱ्यात घडली. या शिक्षकाने हे टोकाचे पाऊल का उचलले? हे अद्याप स्पष्ट झाले नाही. पण वर्गात शिक्षकाचा मृतदेह पाहून विद्यार्थ्यांत भितीचे वातावरण पसरले आहे.

पाचोरा स्थित सुपडू भादु विद्या मंदिर शाळेत ही घटना घडली आहे. रवींद्र भारत महाले असे आत्महत्या केलेल्या शिक्षकाचे नाव आहे. त्यांनी बुधवारी सकाळी १०.३० वा. शाळेच्या दुसऱ्या मजल्यावरील एका वर्गात गळफास लावून आत्महत्या केली. यावेळी विद्यार्थी मधल्या सुट्टीसाठी वगार्बाहेर गेले होते. वर्गात कुणीही नव्हते. ही संधी साधून रवींद्र महाले यांनी आत्महत्या केली. सुट्टीनंतर विद्यार्थी वर्गात परतले असता त्यांना शिक्षक गळफास घेतलेल्या स्थितीत आढळले. हे पाहून त्यांनी एकच आरडाओरडा सुरू केला. त्यानंतर ही घटना समोर आली.

शिक्षक रवींद्र महाले यांनी आत्महत्या का केली? हे अद्याप स्पष्ट झाले नाही. पण ही घटना शाळा सुरू असताना घडल्यामुळे विद्यार्थी वर्गात भितीचे वातावरण पसरले आहे. या घटनेची माहिती मिळताच पाचोरा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत मृतदेह ताब्यात घेतला.

पोलिस या घटनेचा सर्वच अंगाने तपास करत आहेत. पण तूर्त मानसिक तणावामुळे रवींद्र महाले यांनी आत्महत्या केली असेल असा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे. या प्रकरणी पाचोरा पोलिस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

## भाषा संवर्धनासाठी राज्य मराठी विकास संस्था

राज्य मराठी विकास संस्था ही मराठी भाषेच्या विकासाकरता प्रयत्न करणारी महाराष्ट्र शासनपुरस्कृत संस्था आहे.

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास हे संस्थेचे बोधवाक्य आहे.विविध क्षेत्रात मराठीचा होणारा वापर अधिकाधिक गुणवत्तापूर्ण होत जावा यासाठी प्रयत्नशील राहावे व मराठी भाषेच्या अभिवृद्धीची प्रक्रिया नियोजनपूर्वक गतिमान करावी ही या संस्थेच्या स्थापनेमागील दोन मुख्य उद्दिष्टे आहेत.

राज्य मराठी विकास संस्थेची मुद्रा ही आकाराने पिंपळपानासारखी असून ती मराठी वर्णमाला वापरून तयार करण्यात आली आहे. या उद्दिष्टांनुसार सर्व स्तरांवर मराठीचा विकास साधण्यासाठी राज्य मराठी विकास संस्थेच्या वतीने स्वतंत्रपणे उपक्रम हाती घेण्यात येतात.

भाषा व संस्कृती या क्षेत्रांत मराठी भाषेच्या अभिवृद्धीसाठी काम करणाऱ्या विविध शासकीय तसेच अशासकीय संस्थांमध्ये समन्वय राखून त्या संस्थांच्या साहाय्यानेही काही उपक्रम पार पाडण्यात येतात. राज्य मराठी विकास संस्था मराठी भाषेच्या संवर्धनार्थ काम करते.

संस्थेच्या अधिकृत संकेतस्थळावर जाहीर केल्याप्रमाणे संस्थेची प्रमुख उद्दिष्टे महाराष्ट्राची व्यवहारभाषा, प्रशासनिक भाषा आणि ज्ञानभाषा या तिन्ही स्तरांवर मराठी भाषेचा सर्वांगीण वापर वाढविण्यासाठी विविध मार्गांनी प्रयत्न करणे, कृषी, वैद्यक, उद्योग, व्यापार, विज्ञान, तंत्रज्ञान, प्रसारमाध्यमे इ. व्यवहारक्षेत्रांत मराठी भाषेचा वापर वाढविण्यासाठी आवश्यक साधनसामग्री विकसित करणे; तसेच भाषेशी संबंधित असलेल्या तंत्रविद्यांचा विकास करणे.वेळोवेळी भाषिक पाहणीचे कालबद्ध कार्यक्रम निश्चित करून व मराठीच्या विविध व्यवसायक्षेत्रांतील स्थितिगतीचे निरीक्षण करून त्यांचे समाज भाषावैज्ञानिक अहवाल शासनाला सादर करणे, शासनव्यवहाराच्या प्रशासन, कायदा, न्याय, जनसंपर्क अशा विविध शासकीय व निमशासकीय यंत्रणांमध्ये मराठी भाषेचा लोकाभिमुख आणि सुलभ वापर वाढविण्यासाठी भाषिक उपक्रम हाती घेणे व उपकरणे निर्माण करणे. शिष्टाचार, औपचारिक भाषाव्यवहार व भावाभिव्यक्ती समृद्ध करण्यासाठी भाषिक नमुने निर्माण करणे व उपलब्ध करणे .मराठी भाषेतून नव्या ज्ञानाची निर्मिती होण्यासाठी परिभाषेची घडण, निरनिराळ्या ज्ञानस्त्रोतांची उपलब्धी, भाषेचा सृजनशील वापर वाढविणारे कृतिकार्यक्रम यांना प्रोत्साहन देणे, बहुजनांच्या बोलीभाषा आणि प्रमाण मराठी यांच्यातील अभिसरण वाढवून त्यांच्या समवर्ती संबंधातून मराठी भाषा अधिकाधिक लोकाभिमुख व समृद्ध करण्यासाठी प्रयत्न करणे, लेखनविषयक नियम, वर्णमाला, भाषिक वापराची यांत्रिक उपकरणे, संगणकीय आज्ञावली यांच्या वापरात सुसूत्रता व सुबोधता आणण्यासाठी शासनाला मार्गदर्शक तत्त्वे उपलब्ध करून देणे, माहिती तंत्रज्ञानविषयक गरजा लक्षात घेऊन मराठीत अनुरूप आज्ञावली विकसित करणे हि उद्दिष्टे आहेत.

२५ जून १९७९ रोजी मुंबई येथे महाराष्ट्र राज्यातील शैक्षणिक अभ्यासक्रमात व प्रशासनात मराठी भाषेचे स्थान या विषयावर एक परिषद घेण्यात आली होती. त्या परिषदेत मराठी भाषेसाठी एक राज्यस्तरीय संस्था स्थापण्यात यावी, अशी सूचना करण्यात आली. याविषयी विस्तृत टिप्पणी करण्यासाठी एक अनौपचारिक अभ्यासगट निर्माण करण्याचा निर्णय शासनाने घेतला. या अभ्यासगटाचे निमंत्रक म्हणून प्रा. वसंत बापट आणि अन्य सदस्य म्हणून प्रा. मे. पुं. रेगे, प्रा. वसंत दावतर, डॉ. अशोक केळकर आणि प्रा. मं.वि. राजाध्यक्ष यांची नियुक्ती करण्यात आली. अभ्यासगटाच्या सदस्यांनी एक टिप्पणीवजा आराखडा तयार केला. जो मराठी भाषेच्या संवर्धनासाठी अनुकूल असा होता.

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्था
मराठी भाषा विभाग, महाराष्ट्र शासन.

लोकजागर

■ ■ ■


## नोव्हो नॉर्डिस्कचे वजन व्यवस्थापन औषध विगोव्ही आता भारतात उपलब्ध



नोव्हो नॉर्डिस्क ही डॅनिश औषध कंपनी आहे जिच्याकडे दीर्घकालीन रोगांची काळजी घेण्यासाठी १०० वर्षांहून जास्त काळाचा वारसा आहे आणि तिने भारतामध्ये विगोव्ही (इंजेक्शन घेण्यायोग्य सेमाग्लुटाइड) लाँच करण्याची घोषणा केली.

विगोव्ही हे एक आठवड्यात एकदा इंजेक्शन घेण्यायोग्य ग्लुकागॉन-सारखे पेप्टाईड-1 रिसेप्टर अगॉनिस्ट (जी.एल.पी-1 आर.ए) असून हे स्थूलतेने त्रस्त असलेल्या लोकांसाठी भारतात दीर्घकालीन वजन व्यवस्थापन आणि महत्त्वाच्या प्रतिकूल हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी घटनांची (एम.ए.एस.इ ची) जोखीम कमी करण्यासाठी दर्शविलेले पहिले आणि एकमेव औषध आहे. हे पाच डोस ताकदींमध्ये उपलब्ध असून त्यात अभिनव वापरण्यास सुलभ पेन उपकरणाची सोय आहे.

विगोव्ही हे एक प्रिस्क्रिप्शन-केवळ औषध आहे ज्यामध्ये लठ्ठपणा किंवा जास्त वजन असलेल्या लाखो भारतीयांचे जीवनमान सुधारण्याची क्षमता आहे. अभ्यासानुसार, भारतात सामान्यीकृत लठ्ठपणा असलेले २५४ दशलक्ष लोक आणि पोटातील लठ्ठपणा असलेले ३५१ दशलक्ष लोक आहेत.

जास्त वजन आणि लठ्ठपणा असलेले लोक राहणाऱ्यांमध्ये भारत तिसऱ्या क्रमांकावर आहे. चिंताजनक म्हणजे, लठ्ठपणा हा २०० हून अधिक आजारांशी संबंधित आहे, ज्यामध्ये हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी रोग, विशिष्ट प्रकारचे कर्करोग आणि टाइप २ मधुमेह यांचा समावेश आहे.

लठ्ठपणाबद्दल गैरसमजांमध्ये असे म्हटले जाते की ते चुकीच्या जीवनशैली निवडी आणि स्वयं-शिस्तीच्या अभावाचा परिणाम आहे. तथापि, लठ्ठपणा अनेक वेगवेगळ्या घटकांमुळे होतो, ज्यामध्ये अनुवंशशास्त्र, जीवशास्त्र, मानसशास्त्र, समाज आणि आपण ज्या वातावरणात राहतो त्यासह. टाइप २ मधुमेह किंवा दमा यासारख्या इतर जुनाट आजारांप्रमाणे, लठ्ठपणासाठी प्रभावी उपचार उपायांसह दीर्घकालीन व्यवस्थापन आवश्यक आहे. विगोव्ही लाखो भारतीयांमध्ये स्थूलतेने त्रस्त किंवा वजन जास्त असलेल्या लोकांच्या जीवनाच्या गुणवत्तेत सुधारणा करण्याची क्षमता ठेवते.

■ ■ ■


: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

## नांडेदमध्ये सरकारच्या आदेशाची होळी, सांगलीत जमिनीची मोजणी पाडली बंद

# शक्तिपीठ महामार्गाविरोधात शेतकरी आक्रमक

■ वृत्तसंस्था, नांदेड / सांगली, दि. २५ :
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारने शक्तिपीठ महामार्गाच्या भूसंपादनाला मंजुरी दिली आहे. मुख्यमंत्र्यांचा महत्वकांक्षी प्रकल्प असणाऱ्या या महामागार्साठी सरकारने तब्बल २० हजार कोटींची तरतूद केली आहे. पण आता शेतकऱ्यांनी या महामार्गाला कडाडून विरोध सुरू केला आहे. नांदेड येथील शेतकऱ्यांनी सरकारच्या यासंबंधीच्या आदेशाची होळी केली असून, सांगली येथील शेतकऱ्यांनीही महामार्गाची मोजणी बंद पाडली आहे.



शक्तिपीठ महामार्ग हा नागपूर व गोवा या दोन शहरांना जोडणार आहे. हा महामार्ग वर्धा, यवतमाळ, हिंगोली, नांदेड, परभी, बीड, लातूर, सांगली, सोलापूर, कोल्हापूर, सिंधुदुर्ग मार्गे गोव्यापर्यंत जाणार आहे. पण या महामार्गात अनेक सुपीक जमिनी जाणार आहेत.

त्यामुळे शेतकऱ्यांनी या महामागार्ला कडाडून विरोध केला आहे. परिणामी, सरकार व शेतकरी यांच्यात या मुद्यावरून तीव्र संघर्ष होण्याची शक्यता आहे. नांदेडच्या मालेगाव येथे शेतकऱ्यांनी या महामार्गाविषयी काढलेल्या आदेशाची होळी केली आहे.

या आंदोलनात नांदेड, परभणी व हिंगोली येथील शेकडो शेतकरी सहभागी झाले होते. शक्तिपीठ महामार्ग शेतकऱ्यांच्या हिताचा नाही. काही मोजक्याच लोकांच्या हितासाठी हा मार्ग शेतकऱ्यांवर लादण्यात येत आहे. या प्रकल्पात हजारो कोटींचा भ्रष्टाचार होत आहे. त्यामुळे आम्ही हा महामार्ग कोणत्याही स्थितीत होऊ देणार नाही, असा दावा आंदोलक शेतकऱ्यांनी केला आहे.

**सांगलीत मोजणी पाडली बंद**

दुसरीकडे, सांगली जिल्ह्यातील आटपाडी तालुक्यातील शेटफळे येथे शेतकऱ्यांनी शक्तिपीठ महामार्गाच्या भूसंपादनासाठी आलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचे काम रोखून धरले आहे. शक्तिपीठ महामार्गात शेटफळे गावातील ४२९ शेतकऱ्यांच्या जमिनी जात आहेत. या प्रकरणी ४० हेक्टरहून अधिक क्षेत्र बाधित होणार आहे.

महसूल विभागाने भूसंपादनासाठी केवळ एक दिवस अगोदर म्हणजे मंगळवारी शेतकऱ्यांना नोटीसा पाठवल्या होत्या. त्यानंतर दुसऱ्याच दिवशी म्हणजे आज बुधवारी थेट अधिकारी आपल्या सामानासह मोजणीसाठी पोहोचले होते.

दरम्यान, सरकारने या महामार्गाचा अट्टहास धरला असला तरी राज्यभरातून या महामार्गाला विरोध वाढू लागला आहे.